# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ओबीसी, दलितांचे आरक्षण कमी करुन ते मुस्लिमांना देण्याचा महाविकास आघाडीचा घाट : अमित शाह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०जळगाव**

ओबीसी आणि मुस्लिमांचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना देण्याचा घाट महाविकास आघाडीने घातला आहे. म्हणूनच काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात मुस्लिमांना १०% आरक्षण देण्याची घोषणा केली आहे. आरक्षणाची मर्यादा ही ५० टक्क्यांपेक्षा जास्त होऊ शकत नाही. त्यामुळे ओबीसी आणि दलितांचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, असा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील फैजपूर येथे महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित केलेल्या प्रचार सभेत केला.



जोपर्यंत संसदेत भाजपचा खासदार आहे तोपर्यंत मुस्लिमांना आरक्षण मिळू देणार नाही, असंही अमित शाह यावेळी म्हणाले.या सभेला भाजप नेते गिरीश महाजन, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासोबत जळगाव जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार उपस्थित होते. फैजपूर येथील जे. टी. महाजन इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर ही सभा पार पडली.

महाराष्ट्राची निवडणूक म्हणावी तितकी सोपी नाही. कारण यावेळी शिवसेनेची दोन शकलं झाली आहेत आणि राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकलं झाली आहेत. त्यामुळे यंदा सहा पक्षांची लढाई एकमेकांच्या विरोधात रंगणार आहे. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक यंदा सोपी नाही. कारण महायुती विरुद्ध महाविकास आघाडी थेट सामना आहे. दरम्यान भाजपाने जेव्हा जाहीरनामा जाहीर केला त्यानंतर महायुतीची सत्ता आल्यास मुख्यमंत्री कोण? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी त्याचं उत्तर अमित शाह यांनी दिलं आहे.

महायुतीचे सरकार आल्यानंतर आता धर्मांतरविरोधात कठोर कायदा करणार आहे, असे अमित शाह यांनी सांगितले. यावेळी त्यांनी काँग्रेसवर शेतकऱ्यांचे प्रश्न न सोडवल्याबाबत टीका केली, ते म्हणाले. काँग्रेस सरकार असताना शेतमालासाठी किमान आधारभूत किंमतीवर किती घेतला गेला. आता महायुती सरकार असताना किती घेतला गेला, त्याचा डाटा डाऊनलोड करुन पाहा. तसेच राज्यात सर्वाधिक जास्त दंगे आघाडीच्या सरकारमध्ये झाले आहेत. काँग्रेसच्या सरकारमध्ये झाले आहेत. संघावर बंदी आणण्याचे तीन वेळा प्रयत्न काँग्रेसने केले आहे. परंतु प्रत्येक वेळी संघ अधिक मजबूत होऊन पुढे आला आहे. आता तर काँग्रेसची सरकार येणार नाही? यामुळे हा प्रश्नच येत नाही. पूर्ण बहुमताने महायुतीचे सरकार येणार आहे, असे एका प्रश्नाच्या उत्तरात अमित शाह यांनी सांगितलं आहे.

### महायुतीचं सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री कोण?

महायुतीचे सरकार आल्यावर मुख्यमंत्री कोण होणार? या प्रश्नावर अमित शाह म्हणाले, सध्या महायुतीचे नेतृत्व एकनाथ शिंदे करत आहेत. निवडणूक त्यांच्या नेतृत्वाखाली लढवली जात आहे. निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण होणार? हे तिन्ही पक्षाचे नेते एकत्र बसून निर्णय घेणार आहेत, असं अमित शाह यांनी म्हटलंय. महायुतीची सत्ता आल्यावर तीन पक्षांची कमिटी तयार होणार आहे. ती कमिटी तिन्ही पक्षाचा संकल्पपत्राचा अभ्यास करुन ती लागू करण्याबाबत निर्णय घेणार आहे. असं अमित शाह यांनी स्पष्ट केलं.






## मविआतील मुख्यमंत्रीपदाचा दावेदार ठरला?



**विदर्भ प्रजासत्ताक दि. १०मुंबई**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रचाराला वेग आला आहे. जाहीरनामे प्रसिद्ध होत आहेत. आश्वासने, शब्द, गॅरंटी, वचने दिली जात आहे. केंद्रातील नेते, पदाधिकारी राज्यात येऊन प्रचार करत आहेत. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. यातच मुख्यमंत्रीपदाबाबत पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत. ऐन प्रचारातही मुख्यमंत्री कोण होणार, हा मुद्दा चांगलाच गाजताना पाहायला मिळत आहे.

निवडणुकांचे पडघम वाजू लागताच उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा, असा आग्रह धरला होता. परंतु, महाविकास आघाडीतील नेत्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. तसेच निवडणूक निकालानंतर त्यावर चर्चा करून निर्णय करू, असेच सांगत राहिले. महाविकास आघाडीत मुख्यमंत्रीपदाबाबत अनेक नेते आणि त्यांचे कार्यकर्ते दावे करताना पाहायला मिळाले. सुप्रिया सुळे यांच्यापासून ते नाना पटोलेंपर्यंत अनेकांचे बॅनर भावी मुख्यमंत्री म्हणून झळकले. यातच आता प्रत्यक्ष निवडणुकीच्या प्रचारातही भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत सूतोवाच करत पुन्हा एकदा चर्चांना द्वारे खुली करून दिली. यानंतर आता शरद पवार यांनी महाविकास आघाडीतील मुख्यमंत्रीपदाबाबतचा फॉर्म्युला स्पष्ट करत सगळ्या सस्पेन्सला पूर्णविराम दिल्याचे सांगितले जात आहे.

महाविकास आघाडीचे सरकार आल्यास महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार, असा प्रश्न शरद पवारांना विचारण्यात आला होता. आम्ही महाविकास आघाडीतील नेतेमंडळी बसून यावर चर्चा करू. जो पक्ष सर्वाधिक जागा जिंकेल त्यांचा नेता मुख्यमंत्री होईल. ज्या पक्षाच्या सर्वाधिक जागा येतील, आम्ही त्यांना विनंती करू की तुम्ही तुमचा प्रतिनिधी निवडा, आमचा त्याला संपूर्ण पाठिंबा असेल. याचाच अर्थ ज्याचे जास्त आमदार त्याचा मुख्यमंत्री होईल. माझ्या पक्षाचे हेच धोरण आहे, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले आणि महाविकास आघाडीची सत्ता आल्यास कोणाचा मुख्यमंत्री होणार, या चर्चांना एक प्रकारे स्पष्ट उत्तर दिल्याचे सांगितले जात आहे. शरद पवार एका मुलाखतीत बोलत होते.

## लाडक्या बहिणींना २१०० रुपये, २५ लाख नवीन नोकऱ्या...; भाजपच्या संकल्प पत्रात काय-काय?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधुम सुरु आहे.या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने रविवारी (दि.१०) आपले संकल्प पत्र म्हणजेच निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थित भाजपने हे संकल्प पत्र जारी केले आहे. या संकल्प पत्रात अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. यावेळी देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, आशिष शेलार उपस्थित होते.



आज १० नोव्हेंबरच्या दिवशीच छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजल खानाला पराभूत केले होते, त्याच शिवशक्तिच्या प्रेरणेने काम करणारे नेते हा अर्थसंकल्प सादर करत आहेत, असे सांगत भाजपकडून या पत्रकार परिषदेची सुरूवात करण्यात आली. यावेळी संकल्प पत्र हे आकांक्षांचे प्रतिबिंब आहे, असे गृहमंत्री अमित शाह म्हणाले. तसेच, भाजप सरकारने मागच्या दहा वर्षात मोठी कामे केली आहेत, असे सांगत अमित शाह यांनी उद्धव ठाकरेंसह शरद पवार आणि काँग्रेसवरही निशाणा साधला.

आघाडी सरकारच्या काळात जनतेला खूप त्रास सहन करावा लागला, असे अमित शाह म्हणाले. तसेच, जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द होईल, यावर कोणाचाही विश्वास नव्हता. पण आज एनडीए सरकारने कलम ३७० रद्द करण्याचे काम केले आहे. आम्ही समृद्ध भारताचे वचन दिले होते. १० वर्षात आम्ही देशाची अर्थव्यवस्था पाचव्या स्थानावर नेली. आमचे वचन आहे की, २०२७ मध्ये आम्ही भारताला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवू, असे अमित शाह यांनी सांगितले.महायुतीची महत्त्वाकांशी योजना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. आता लाडक्या बहिणींना १५०० नाही तर २१०० रुपये देणार, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच, हे संकल्पपत्र म्हणजे विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र तयार करण्याचा रोडमॅप आहे, २०१४ मध्ये जे संकल्पपत्र जाहीर केलं होतं, २०१९ च्या निवडणुकांना सामोरे जाताना त्या संकल्पपत्रातील कोणत्या गोष्टी पूर्ण केला, याचा रिपोर्ट दिला होता. त्यामुळे भाजपकरिता किंवा महबायुतीसाठी संकल्पपत्र म्हणजे फक्त कागदी डॉक्युमेंट नाही, तर त्या दिशेने काम करण्यासाठी एक अतिशय पवित्र अशा प्रकारचं डॉक्युमेंट आहे. राज्यातील जनतेचा विश्वास महायुतीवर आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**भाजपच्या संकल्पपत्रात काय-काय आहे?**

लाडक्या बहिणींना पुढील काळात १५०० ऐवजी २१०० रुपये देणार

शेतकऱ्यांसाठी भावान्तर योजना (हमीभावाने खरेदी होणार नाही, त्याठिकाणी फरकाची रक्कम खात्यात टाकणार)

शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार

प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवाऱ्याचा हक्क

वृद्धांची पेन्शन २१०० (सहायतेच्या योजनांमध्ये वाढ करणार)

जीवनावश्यक वस्तुंचे भाव स्थिर ठेवणार

२५ लाख रोजगारांची निर्मिती

१० लाख विद्यार्थ्यांना वेतन

गरीब आणि मध्यमवर्गीयांसाठी सौरचा वापर करुन ३० टक्के कमी करणार

विज्ञान तंत्रज्ञान : मेक इन महाराष्ट्राला प्रभावीपणे राबवणार

महाराष्ट्राला फिनटेक आणि एआयचं हब करू

एअरोनॉटिकल आणि स्पेसमध्ये उत्पादनावर काम करू

अक्षय अन्न योजना

महारथी : एआय लॅब्स

कौशल्य जनगणना करणार

छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र

हमी भावापेक्षा कमी भावात खरेदी करत असेल तर भावात्तम रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात टाकणार

अडीच वर्षांमध्ये १ लाखापेक्षा जास्त सरकारी नोकऱ्या दिल्या.

## महाविकास आघाडीने जाहीरनामा प्रसिद्ध
## बेरोजगारांना ४ हजार रुपये देणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

महाविकास आघाडीनेही रविवारी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. विकास आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात १०० दिवसांचा अजेंडा जाहीर केला. पदवीधर आणि पदविका असलेल्या बेरोजगार तरुणांना दरमहा ४,००० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. जाहीरनाम्यात महाराष्ट्रात नवे औद्योगिक धोरण बनवण्याबाबत प्रसिद्ध करण्यात आले आहे.



आज महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांनी मुंबई पत्रकार परिषद घेतली. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, आमदार नाना पटोले, राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत उपस्थित होते. यावेळी बोलताना मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, आमच्या पाच हमी महाराष्ट्रातील सर्वांच्या कल्याणासाठी उपयुक्त ठरतील. प्रत्येक कुटुंबाला अंदाजे ३ लाख रुपयांची वार्षिक मदत मिळणार आहे. आमची महालक्ष्मी योजना सर्व महिलांना आर्थिक मदत करेल. याअंतर्गत महिलांना दरमहा ३ हजार रुपये दिले जाणार आहेत. महाराष्ट्रातील महिलांसाठी मोफत बससेवा सुरू करणार.

**शेतकऱ्यांना ५०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम**

खरगे म्हणाले की, 'जे शेतकरी वेळेवर कर्जाची परतफेड करतात त्यांना ५०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम दिली जाईल. महिलांना वर्षभरात सहा सिलिंडर दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. गॅस सिलेंडरची किंमत ५०० रुपये असेल. राज्यात जात जनगणनाही होणार आहे. 'महाराष्ट्राचे भविष्य बदलण्याची ही निवडणूक आहे. महाविकास आघाडीने १०० दिवसांचा अजेंडाही जाहीर केला, असंही खरगे म्हणाले.

### महाविकास आघाडीच्या पाच गॅरंटी

१- महालक्ष्मी
महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन.
बसमध्ये महिलांसाठी मोफत प्रवासाची सुविधा.
२- समानतेची गॅरेंटी
जातिनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन.
५० टक्के आरक्षणाची मर्यादा हटवणार.
३- कौटुंबिक संरक्षण
२५ लाखांपर्यंत आरोग्य विम्याचे आश्वासन.
मोफत औषधांची सुविधा.
४- कृषी समृद्धी
शेतकऱ्यांचे तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचे आश्वासन.
नियमित कर्ज परतफेडीवर ५०,००० रुपयांचे प्रोत्साहन.
५- तरुणांना वचन-
बेरोजगारांना दरमहा ४,००० रुपयांची आर्थिक मदत.

## निवडणूक हंगामात इव्हेंट कंपन्यांचा व्यवसाय तेजीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

उमेदवारच एकनिष्ठ राहिलेले नसल्याने प्रामाणिक कार्यकर्ते मिळणेही दुरापास्त झाले आहे. अशा परिस्थितीत कार्यकर्त्यांची उणीव भरून काढण्यासाठी, अन हायटेक प्रचाराद्वारे मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवारांकडून इव्हेंट कंपन्यांची मदत घेतली जात आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक हंगामात इव्हेंट कंपन्यांचा धंदा तेजीत आला आहे. पूर्वी उमेदवारासोबत भेळभत्ता खाऊन काम करणारे कार्यकर्ते असायचे, आता मात्र हे चित्र पूर्णपणे बदलले असून, कार्यकर्त्यांसाठी उमेदवाराला मोठा खर्च करावा लागत आहे. या खर्चाच्या तुलनेत इव्हेंट कंपन्या कमी खर्चात काम करण्यास तयार असल्याने उमेदवारांकडून इव्हेंट कंपन्यांवर मोठी जबाबदारी टाकली जात आहे. सर्व्हेपासून प्रचारापर्यंत, भाषणे लिहून देण्यापासून 'ऑल अंडर वन रूफ' कामकाजापर्यंत सर्वच कामे करण्यास इव्हेंट कंपन्या तयार आहेत. यामुळे जिल्ह्यातील अनेक श्रीमंत उमेदवारांकडून इव्हेंट कंपन्यांना हायर करण्यात आले आहे. निवडणूक कार्यालयात जाऊन उमेदवाराच्या कागदपत्रांची पूर्तता करणे, पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी करून घेणे, प्रचारपत्रकांची छपाई करून आणणे आदी कामे या कंपन्या करून देत आहेत. याचबरोबर मतदारसंघातील प्रत्येक घरापर्यंत पक्षाची ध्येयधोरणे, प्रचारपत्रके पोहोचविणे, लाउडस्पीकरवरून उमेदवाराचा प्रचार करणे, आदी कामे इव्हेंट कंपन्यांकडून केली जात आहेत.

## संपादकीय ......

# पावसातली ‘निवडणूक’ अन् दिवाळी!

*दररोज सकाळ-संध्याकाळ पाऊस कोसळत होता. यामुळे शेतकऱ्यांना भातकापणी आणि भाताची झोडणी अशा सर्वच बाबतीत अक्षरश: कसरत करीत कामे आटोपवावी लागली. एकिकडे हे पावसाळी वातावरण राहिल्याने नोव्हेंबर महिन्यात सुरू होणारी थंडी अद्यापपर्यंत सुरू झालेलीच नाही. दिवाळीचा अभ्यंगस्नानाचा पहिला दिवस हा कडाक्याच्या थंडीचा असायचा. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी प्रचंड पडलेली कडाक्याची थंडी या अशा थंडीच्या वातावरणातील अभ्यंगस्थान आणि तुळशी वृंदावनासमोर निरांजनाच्या किंवा समईच्या मंद ज्योतीच्या साक्षीने कारीट फोडणे, त्यातल्या दोन-चार कारटाच्या बिया तोंडात टाकणे तो कडवटपणा नकोसा होणारा; परंतु कुटुंबातील ज्येष्ठांकडून, आई-वडिलांकडून होणाऱ्या आग्रहाने तो कारटाचा कडवटपणाही गोड मानून गरमा-गरम कांदा-पोहे आणि आई, वहिणी, बहिणींच्या हातचा घरातला लाडू, चिवडा, चकली, चण्याचं पीठ आणि गूळ घालून बनवलेली करंजी असा सकाळच्या प्रहरी नाश्ता करूनच दिवाळी सणाचा शुभारंभ व्हायचा. आजही यात फार बदल घडला असे नाही; परंतु अलिकडे तयार मिळणारा फराळ बाजारात जागो-जागी उपलब्ध असतो; परंतु घरात आई-बहिणींच्या हातच्या फराळाची चव कशाला येऊच शकत नाही.*

*बदलत्या स्थितीत गावातली दिवाळी आणि शहरांमधली दिवाळी हा मोठा फरक फार पूर्वीपासून आहे. गावातून फटाक्यांची आतषबाजी किंवा विद्युत रोषणाई नसते; परंतु पहाटेच्या अभ्यंगस्नानाला पहिलं कारीट कोणी फोडलं यात मात्र जोरदार स्पर्धा असायची. ‘गोविंदा रे गोपाळा’ अशी गावातल्या वाडीत पहिली आरोळी कोणी ठोकली यावरून स्पर्धा असायची आणि मग पहाटे पहिला कोण उठला यातही सकाळी एक दुसऱ्याकडे फराळ करताना आपल्या कोकणात खूप गजाली व्हायच्या. अलिकडे हे वातावरण राहिले नाही. सर्वसाधारणपणे वातावरणातील बदलाचा परिणाम निश्चितपणे होत आहे. या वर्षीची दिवाळी ही महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीच्या वातावरणातच होत आहे. दिवाळीच्या या पंधरवड्यातच राज्यातील निवडणुका पार पडत आहेत. या निवडणुका दिवाळीत होत असल्याने निवडणूक प्रचार करणाऱ्या उमेदवार आणि कार्यकर्त्यांनाही अतिशय आनंदी, उत्साही वातावरणात निवडणूक प्रचारही होताना दिसतो. कोकणात तीन-चार मतदारसंघांत चौरंगी, तिरंगी, पंचरंगी लढत होत आहे. यामुळे साहजिकच निवडणुकीतील वातावरण ढवळून निघत आहे. खरंतर कोणत्याही निवडणुका या विकासाच्या मुद्यावर लढवल्या गेल्या पाहिजेत. आपल्या सत्ता काळात कोणती विकासकामे झाली. समाजहिताचे कोणते निर्णय सरकारने घेतले.*

*सरकारने घेतलेल्या निर्णयांचा फायदा सर्वसामान्य जनतेला कसा होऊ शकला याची मांडणी झाली पाहिजे; परंतु आपण काय काम केले. जनतेच्या हिताचे कोणते निर्णय घेतले हे ज्यांना सांगता येत नाहीत किंवा सांगण्यासारखं काही नसते ते नेते, पुढारी वैयक्तिक टीका करत राहतात.कोकणातील कोणत्याही निवडणुका असल्या तरीही ‘राणे’ टार्गेट केले जातात. कोणत्याही निवडणुकीत राणे हेच टीकेंच्या केंद्रस्थानी असतात. वैयक्तिक स्वरूपात त्यांच्यावर टीका केली जाते. यामध्ये कोकणातील हे देखील एक सत्य आहे की विरोधकांकडून राणेंवर कितीही टीका झाली तरी निवडणुकीत निवडून मात्र राणेच येतात. यामुळे कोकणातील निवडणुका म्हटल्या की, विकासावरची चर्चा केलेली विकासकामे यावर चर्चाच होताना दिसत नाही. कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या पाचही जिल्ह्यांमध्ये एकिकडे अधून-मधून येणारा पाऊस, शेतात धावपळीत असणारा शेतकरी आणि त्याचवेळी निवडणुकीचे असलेले वातावरण या निवडणुकीचा प्रचार, शेतकऱ्यांच्या, ग्रामस्थांच्या, कार्यकर्त्यांच्या होणाऱ्या गाठीभेटी, होणारा संवाद, वैयक्तिक संवादावरच यावेळच्या निवडणुकीत भर देण्यात आला आहे. यामुळे एकिकडे मध्येच पावसाळी वातावरण, निवडणुकीचे कार्यकर्ते, पुढारी यांची धावपळ आणि दिवाळीतील उत्साही वातावरण अशा या वातावरणात कोकणवासीय शेतीची कामे, दिवाळीच्या फराळाचा आस्वाद आणि निवडणुकीतील टीकाटिपणीचे फटाके याचा आनंद घेत आहेत.*

# तुरीवर शेंगा पोखरणारी अळीचा प्रादुर्भाव ; असे करा व्यवस्थापन

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

तुरीचे पीक फुलधारणा अवस्थेत असताना वातावरणामुळे किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. फवारणी करूनही किडीच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविता येत नसल्याने, उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी वर्तविली आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकरी सततच्या पावसामुळे अडचणीत आले आहेत. त्यातच तूर पिकावर मोठ्या प्रमाणात किडींचा प्रादुर्भाव झाल्याने उरल्यासुरल्या पिकाचेही नुकसान होऊन उत्पादन घटण्याची शक्यता वाढली आहे.

शेतकरी कीड नियंत्रणासाठी कीटकनाशक फवारणी करत आहेत; परंतु औषधाचाही उपयोग होत नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

मागील काही दिवसांपासून पावसाने हजेरी लावली नसली तरी अधूनमधून ढगाळ वातावरण राहात आहे.

त्यात दमट हवामान तूर पिकावरील किडींसाठी पोषक ठरत आहे. बदलत्या

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

वातावरणामुळे अळीपासून तुरीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. काही भागांत तुरीवर शेंगा पोखरणारी अळी, शेंगमाशी, पिसारी पतंग या अळींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सर्वेक्षण केल्यानंतर शेतकऱ्यांनी या अळींची व्यवस्थापन करण्याबाबतचा सल्ला कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा येथील तज्ज्ञांनी दिला आहे.

सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात झालेल्या पावसामुळे तूर चांगल्या अवस्थेत आहे. खरीप हंगामातील तोटा भरून काढण्यासाठी शेतकरी तूर पिकाची योग्य निगा राखत असून, अनेकांनी तुरीला पाणी देण्यास सुरुवात केली आहे.

अशातच तुरीवर विविध अळींचा प्रादुर्भाव होत असल्याने पीक उत्पादनात घट होण्याच्या भीतीने शेतकरी त्रस्त झाले आहेत. त्यावर काय उपाय करावा, फवारणी कधी करावी, याबाबत शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे.

तुरीचे पीक फुलांवर आले असताना अचानक वातावरणातील बदलामुळे किडींचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे तुरीचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. महागड्या औषधांची फवारणी करण्याचा खर्च मात्र वाढला आहे. - गणेश इंगोले, शेतकरी, वाशिम

### एकात्मिक व्यवस्थापन

शेंगा पोखरणारी अळी, शेंगमाशी आणि पिसारी पतंग या प्रकारच्या तिन्ही किडी अळ्या फुले व शेंगावर आक्रमण करीत असल्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनकरता जवळजवळ सारखेच उपाय करावे लागतात. प्रति हेक्टर २० पक्षी थांबे शेतात उभारावे, त्यामुळे पक्षी किडींच्या अळ्या खाऊ फस्त करतात. अळ्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर असल्यास तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे त्यामुळे झाडावरील




अळ्या पोत्यावर पडतील व त्या गोळा करून नष्ट कराव्यात.

### पिकाची पाहणी करून व्यवस्थापन करा

तूर पिकातील शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या वाढीस पोषक वातावरण आहे. त्यामुळे या अळीचा प्रादुर्भाव वाढून पिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची पाहाणी करून वेळीच व्यवस्थापनाचे उपाय करावे, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल झापे, विषय विशेषज्ञ प्रा. प्रवीण देशपांडे यांनी केले आहे.

### असे आहेत तुरीवरील अळीचे प्रकार

**शेंगा पोखरणारी अळी :** या किडीची मादी पतंग फुले व शेंगा यावर अंडी घालते. अंड्यातून निघालेल्या अळ्या तुरीच्या कळ्या आणि फुले खाऊन नुकसान करतात. पोपटी, फिक्कट गुलाबी व करड्या रंगाची असून, तिच्या पाठीवर तुटक करड्या रेषा असतात. मोठ्या अळ्या शेंगांना छिद्र करून आतील दाणे उकरून खातात.

**शेंगमाशी :** या माशीची अळी बारीक गुळगुळीत व पांढऱ्या रंगाची असून, तिला पाय नसतात. तोंडाकडील भाग निमुळता व टोकदार ही अळी शेंगाच्या आत राहून शेंगातील दाणे अर्धवट कुरतडून खाते व त्यामुळे दाण्याची मुकनी होते.

**पिसारी पतंग :** या पतंगाची अळी १२.५ मिमी लांब हिरवट तपकिरी रंगाची असते. तिच्या अंगावर सूक्ष्म काटे व केस असतात आणि शेंगेवरील साल खरडून छिद्र करते, बाहेर राहून दाणे पोखरते.

### वेळीच फवारणी करा

पहिली फवारणी : पीक ५० टक्के फुलोरावर असताना, निंबोळी अर्क ५ टक्के, अझाडेरेक्टीन ३०० पीपीएम ५० मिली, अझाडेरेक्टीन १५०० पीपीएम २५ मिली, क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली, यापैकी कोणतेही प्रति १० लिटर पाण्यास मिसळून फवारणी करावी

**दुसरी फवारणी :** पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी इमामेक्टीन बेंझोएट ५ एसजी ३ ग्रम, क्लोरेंनट्रानीप्रोल ५ टक्के एस.सी २.५ मिली यापैकी कोणत्याही एका किटनाशकाची प्रति १० लिटर पाण्यास मिसळून फवारणी करावी.

# आचारसंहितेमुळे लांबली युवकांची जर्मनी वारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती** राज्य शासन व जर्मनी यांच्यात मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत करार करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील पात्र युवकांकडून अर्ज मागविण्यात आले होते. ज्या विद्यार्थ्यांचे सिलेक्शन झाले त्यांना जर्मन भाषा व राजशिष्टाचार यांचे प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर त्यांना जर्मनीमध्ये पाठवले जाणार आहे. मात्र, विधानसभा आचारसंहितेमुळे ही प्रक्रिया थांबली आहे. युरोपीय युनियनमधील बहुतांश देश औद्योगिकदृष्ट्या संपन्न आहेत. तथापि, मागील काही वर्षांपासून या देशांना कुशल मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. महाराष्ट्र राज्यात विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या मनुष्यबळासाठी एकतर तुलनेने रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध आहेत.राज्यात उपलब्ध असलेल्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा युरोपीय युनियनमधील देशांना करता यावा व त्यायोगे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत व्हावी, हा शासनाचा दृष्टिकोन आहे.

### आयटीआय व हॉटेल मॅनेजमेंटचे सर्वाधिक विद्यार्थी

डायट'ने युवकांचे अर्ज तपासले असून, त्यापैकी ४३ अर्ज वैध ठरले आहेत. अर्ज वैध ठरलेल्यांमध्ये प्रामुख्याने आयटीआय व हॉटेल मर्नेजमेंट केलेल्या युवकांचा समावेश आहे. जर्मनीत लाखो रुपये पगाराची नोकरी मिळणार आहे. तसेच विदेशात जाण्याची संधी मिळणार असल्याने या नोकरीबाबत युवकांमध्ये उत्सुकता कायम आहे. हॉटेल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम करणारे अनेक युवक विदेशात नोकरी करीत आहेत. त्यांना चांगल्या पगाराची नोकरी उपलब्ध होत आहे. विदेशात असलेले युवक आपल्या देशातील युवकांना प्रोत्साहित करून दुसया देशात रोजगारासाठी नेत आहेत.

# बडनेरा विधानसभा क्षेत्रात तीन उमेदवारांना नोटीस

## खर्च सादर करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती,** बडनेरा विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशित उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी गुरूवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी पार पडली. यात खर्च सादर केलेला नाही, अशा तीन उमेदवारांना नोटीस देऊन ४८ तासाच्या आत खर्च सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

उमेदवारांच्या खर्चावर देखरेख ठेवण्यासाठी खर्च निरीक्षक म्हणून वेंकन्ना तेजावथ यांची नियुक्ती केली आहे. लेख्यांच्या पहिल्या तपासणीवेळी एकूण २६ उमेदवारांपैकी ३ उमेदवार अनुपस्थित राहिले. अनुपस्थित उमेदवारांना ४८ तासांत निवडणूक खर्चाचे लेखे उपविभागीय अधिकारी कार्यालय, जुनी अमरावती तहसील कार्यालय, अमरावती येथे सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे. विहीत मुदतीत खर्च सादर केला नसल्यास नियमानुसार तक्रार दाखल करण्यात येणार आहे. तसेच देण्यात आलेल्या सर्व परवानग्या तात्काळ रद्द करण्यात येणार आहे.

७ उमेदवारांनी पहिली तपासणीवेळी त्यांचा दैनंदिन खर्चाचा लेखा सादर केला असता छायांकित निरीक्षण नोंदवहीसोबत ताळमेळअंती योग्य वाटत नसल्याने त्यांनी खर्चाचा काही भाग सादर केला नाही. या सर्व उमेदवारांना उपविभागीय अधिकारी यांनी नोटीस बजावली. पहिल्या तपासणीअंती उमेदवारनिहाय खर्च हा तात्पुरत्या स्वरुपाचा असून निकालानंतर आयोजित लेखा ताळमेळ बैठकीमध्ये ताळमेळ घेऊन सदर खर्चास अंतिम स्वरुप देण्यात येणार आहे. अंतिम बैठकीनंतर खर्चाचा ताळमेळ झाल्यानंतरच सदरचा खर्च हा भारत निवडणूक आयोगास सादर केला जाणार आहे.

## आरोग्य संपदा आहार

### कोलायटिस व्याधीवर उपचार

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

कोलायटिस किंवा विशेषत: मोठ्या आतड्याला सूज आल्यास आणि त्यामुळे पोटाचे आरोग्य बिघडलेले असल्यास आरोग्यवर्धिनी आणि त्रिफळा गुग्गुळ प्रत्येकी तीन गोळ्या रिकाम्या पोटी घ्याव्या. दोन्ही जेवणानंतर अभयारिष्ट चार चमचे आणि आम्लपित्त वटी तीन गोळ्या घ्याव्या. झोपताना एक चमचा त्रिफळा चूर्ण घ्यावे.

मलावरोध आणि खडा होत असल्यास गंधर्वहरितकी घ्यावे. आतंड्याच्या सूजेबरोबर ग्रहणी म्हणजे मलप्रवृत्तीचे समाधान नसल्यास या दुर्धर विकाराकरिता रिकाम्या पोटी आरोग्यवर्धिनी तीन गोळ्या घ्यावे. झोपताना त्रिफळा चूर्ण घ्यावे.

पोटफुगी हे जादा लक्षण असल्यास प्रवाळ पंचामृत सहा गोळ्या आणि पंचकोलासव आणि शंखवटी आणि पिप्पलादिकाढा गरजेप्रमाणे चार-चार चमचे घ्यावा. जुनाट ग्रहणी, आतड्याची सूज आणि खूप वेळा मलप्रवृत्ती आणि लक्षणाकरिता भोजनोत्तर कुटजारिष्ट चार चमचे आणि कुटजवटी तीन किंवा सहा गोळ्या घ्याव्या.

आतड्यांना सूज आणि वारंवार पातळ जुलाब आणि ग्रहणी या तक्रारीकरिता संजीवनीवटी, शमनवटी आणि कुटजवटी प्रत्येकी सहा गोळ्या आणि पाचक चूर्ण अर्धा चमचा दोन्ही जेवणानंतर घ्यावे.

पथ्य : ही व्याधी असणार्या रुग्णांनी ताजे गरम आणि माफक प्रमाणात भोजन घ्यावे. आहारात पुदीना, आले, लसूण यांची चटणी, तांदूळ भाजून भात किंवा तांदळाची भाकरी, ताक, ज्वारीची भाकरी, पथ्यकर फळभाज्या, अननस, पपई, संत्रे, लिंबू यांचा समावेश असावा.

रसायन चिकित्सा : कुडासाल ताकातून उगाळून घेणे, बिब्ब्याचे शेवते, अमृतभल्लातक



कल्प, संजीवनी.

योग आणि व्यायाम : कोलायटिसचा त्रास असणार्यांनी किमान बारा सूर्यनमस्कार दररोज घालावेत. तसेच पश्चिमोत्तानासन केल्यासही चांगला लाभ होतो. दररोज रात्री झोपण्यापूर्वी फिरून येणे.

रुग्णालयीन उपचारांमध्ये निरुह किंवा कृमीघ्य बस्ती, आवश्यक तेव्हा सौम्य विरेचन, पिच्छबस्ती हे उपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करावेत.या आजारासाठीचा चिकित्साकाल तीन महिने ते एक वर्ष इतका आहे.

निसर्गोपचार : काही काळ ताकावर राहणे, कोष्ठशुद्धीकरता गोमूत्र, लघू आणि अगोड आहार.

संकिर्ण : ‘एक वेळेला जेवेल तो योगी, दोन वेळेला तो भोगी आणि तीन वेळेला जेवेल तो रोगी’ हे जरा अतीशययोक्तीचे दिसणारे वचन सतत डोळ्यांसमोर हवे.

# विद्यापीठात दिव्यांगांच्या स्वयंचलित तीन चाकी ई-सायकली धूळखात तर दुचाकी सायकलींची दयनीय स्थिती

## महासंघाच्या शिष्टमंडळासोबत कुलगुरूंची पाहणी - सायकलींच्या दुरावस्थेबाबत तीव्र नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या शिष्टमंडळाने नुकतीच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांची भेट घेतली. विद्यापीठ प्रशासनातील अक्षम्य दिरंगाई आणि संथ कारभार उघड करणाऱ्या मुद्द्यांवर कुलगुरूंचे लक्ष वेधण्यात आले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उद्दिष्टांत संत गाडगेबाबांच्या विचारांची अंमलबजावणी महत्त्वाची आहे. याच अंतर्गत, २०१७ ते २०२२ कालावधीत महासंघाच्या प्रेरणेतून आणि व्यवस्थापन सदस्य प्रा. प्रदीप खेडकर यांच्या मार्गदर्शनात व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई यांनी दिव्यांगांसाठी स्वयंचलित तीन चाकी सायकली उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव एकमताने मंजूर होऊन सुमारे अडीच वर्षांपूर्वी ३ लाख रुपये खर्च करून ई-सायकलीची खरेदी करण्यात आली. परंतु गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा जपण्याची जबाबदारी असणाऱ्या विद्यापीठात या सायकली अद्यापही प्रत्यक्ष वापरात आणल्या गेल्या नाहीत आणि दिव्यांगांसाठी उपलब्ध करून दिल्या गेल्या नाहीत. वनस्पतीशास्त्र विभागात कंपनीकडून आलेल्या पॅकिंगसह धुळीखात पडून असल्याची माहिती महासंघाने कुलगुरूंच्या निदर्शनास आणून दिली. विद्यापीठ प्रशासनाच्या अनास्थेबाबत महासंघाने चीड व्यक्त केली, ज्यावर कुलगुरूंनी तात्काळ या सायकली पडून असलेल्या वनस्पतीशास्त्र विभागात प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेतला आणि धडक भेट दिली. पाहणीत सायकलींची दुरावस्था समोर आली. इलेक्ट्रिक सायकलींसाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या बॅटरी गायब असल्याचे देखील निदर्शनास आले. प्रत्यक्ष स्थिती पाहून आक्रोश व्यक्त करीत महासंघाच्या शिष्टमंडळाने या अक्षम्य दिरंगाईसाठी जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. माननीय कुलगुरूंनी देखील जबाबदारी टाळण्याचा हा प्रकार असल्याची भावना व्यक्त करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

तसेच, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला माजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या विशेष प्रयत्नाने पी. व्ही. इंडस्ट्रीज, जाम, वर्धा यांच्या कडून उडठ फंड प्राप्त झाला होता. या माध्यमातून एकूण ५५ सायकली विकत घेण्यात आल्या होत्या. संत गाडगेबाबा सायकल योजना अंतर्गत सदर सायकलींच्या वापराबाबत विनियम १०/२०१९ मध्ये नियमावली तयार करून हि योजना प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी विद्यार्थी विकास मंडळाकडे सोपविण्यात आली. सद्यस्थितीत बहुसंख्य सायकली नादुरुस्त अवस्थेत खितपत पडून असल्याची बाब महासंघाने कुलगुरूंना लक्षात आणून दिली. या सायकलींच्या दुरुस्तीसाठी वार्षिक निधी तत्कालीन व्यवस्थापन परिषदेने राखीव केलेला असून देखील आज ही अवस्था का झाली, असा सवाल महासंघाने उपस्थित केला. माननीय कुलगुरूंनी सांगितले की, विद्यार्थी विकास मंडळाने १.० लाख रुपयांची सायकल दुरुस्तीसाठी मागणी केली असताना, व्यवस्थापन परिषदेने या योजनेसाठी हा खर्च जास्त असल्याचे सांगून फक्त ४० हजार रुपये मंजूर केले. या रकमेत कोणताही ठेकेदार सायकली दुरुस्त करण्यास पुढे आला नाही, परिणामी सायकली नादुरुस्त अस्वस्थेत पडून असल्याची बाब समोर आली. मा. कुलगुरूंनी या बाबतीत अधिक चौकशी करून ही योजना अधिक जोमाने राबविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

विद्यापीठात मूल्यांकन कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या दाननिधीची मोठी रक्कम शिक्षक कल्याण निधी म्हणून दरवर्षी जमा होत असते. या निधीतून विद्यापीठ परिसरात तसेच संलग्नित महाविद्यालयात कार्यरत तसेच प्रशासकीय कामासाठी विद्यापीठ परिसरात आलेल्या प्राध्यापकांच्या दुर्दैवी निधनाच्या प्रसंगी, मोठ्या आजाराच्या औषधोपचारासाठी किंवा आणीबाणीच्या प्रसंगी साहाय्य मिळणे अपेक्षित आहे. परंतु तशी योजना अस्तित्वातच नसल्याने मदत करणे शक्य झाले नव्हते. हि बाब लक्षात घेता, अडीच वर्षांपूर्वी तत्कालीन व्यवस्थापन परिषदेने संवेदनशीलतेने विचार करून शिक्षक कल्याण योजना प्रस्तावित केली होती. तत्कालीन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या मार्गदर्शनात, माजी व्य.प.सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ. नंदकिशोर ठाकरे, प्राचार्य डॉ. मिनल ठाकरे, डॉ. संतोष कुटे, डॉ. सुभाष गांवडे यांच्या सहभागाने शिक्षक हिताची योजना तयार करण्यात आली होती. ह्या समितीच्या अनेक बैठकीनंतर अर्ज व आवश्यक दस्तऐवजांसह विस्तृत अहवाल समिती सचिव डॉ. नितीन कोळी यांच्या माध्यमातून मा. कुलगुरूना सोपवण्यात आला होता.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# प्रचाराचे बॅनर लावले; पण घरमालकाची परवानगी घेतली का?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

जसजशी विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख जवळ येत आहे, तसतशा गावखेड्यात प्रचार यंत्रणा जोर धरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. निवडणूक कोणतीही असो, उमेदवारांचे बॅनर हा मुख्य घटक मानला जातो. विधानसभा निवडणुकीत आपले नशीब आजमावत असलेल्या उमेदवारांचे बॅनर मुख्य चौकातील घरांच्या दर्शनी भागात लावण्यासाठी गावातील कार्यकर्त्यांची चढाओढ सुरू आहे.

उमेदवाराच्या प्रचाराचे बॅनर लावण्यासाठी घरमालकाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. परंतु, काही कार्यकर्त्यांना याची माहितीसुद्धा नसते. विनापरवानगीच ते बॅनर लावून मोकळे होतात. आजघडीला गावातील धनाढ्य शेतकरी शहरांच्या ठिकाणी वास्तव्यास आहेत. तरीही त्यांच्या घराला उमेदवारांचे बॅनर लागलेले दिसून येतात. यामुळे ग्रामस्थांकडून आश्चर्य व्यक्त केले जाते. बॅनर लावताना कुणाची परवानगी घेतली? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. निवडणूक विभागाने ग्रामीण भागात फेरफटका मारला तर असे अनेक ठिकाणी विनापरवानगी कार्यकर्त्यांनी उमेदवारांचे बॅनर व फलक




लावल्याचे उघडकीस आल्याशिवाय राहणार नाही. विनापरवानगी बॅनर लावणे हे सुद्धा आचारसंहितेच्या उल्लंघनात येत असून तो उमेदवार कारवाईस पात्र ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### पांढऱ्या पोशाखाची मागणी वाढली

नुकतीच विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू झाली असल्याने गावागावात राजकीय चर्चेचा विषय गाव पारावर रंगलेला दिसून येतो. एवढेच नाही तर गावागावातील तथाकथित राजकीय गावनेता हा शुभ्र पांढऱ्या रंगाचे कपडे घालून मिरवताना दिसत आहे. यामुळे पांढऱ्या पोशाखाची मागणी वाढली आहेत.

### नैसर्गिक थंडीवर राजकीय तापमान भारी

नोव्हेंबर महिना म्हटला की थंडीचा जोर वाढतो. मात्र, यंदा थंडीचा जोर ओसरला असून, निवडणुकीचा जोर ग्रामीण भागात जोमात बघायला मिळत आहे. या निवड- णुकीत काँग्रेस, भाजप, बसपा, वंचित सोबतच अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात असून, कोण बाजी मारणार? यावर ग्रामीण भागातील चौकाचौकांत चर्चा रंगत आहे. यामुळे नैसर्गिक थंडीवर राजकीय तापमान भारी पडत असल्याचे दिसून येत आहे.

**काहींनी ठेवले घरावर तुळशीपत्र–** काहींनी घरावर तुळशीपत्र ठेवून विधानसभा निवडणूक डोक्यावर घेतलेली दिसत आहे. ते आधी गाव पारावर जाऊन आपल्या नेतेगिरीचा तोरा मिरवतात. सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावातील सार्वजनिक ठिकाणी, पानटपरी, गावठाण असो अथवा गावपाराच्या ठिकाणी निवडूक विषयावर चर्चा रंगलेल्या दिसून येत आहेत. यात अनेकांचा सहभाग असून, वेळ घालवत बराच विचार- विमर्श करत असल्याचे चित्र सध्या तालुक्यात दिसून येत आहे. काही गावनेत्यांना तर झोपेचेही भान राहिलेले नाही.

# महायुती–महाविकास आघाडीला चिंता

## तिरंगी ,चौरंगी लढतींमुळे वाढली चुरस

### मातब्बर अपक्षांमुळे उमेदवारांना मतविभागणीचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०बडनेरा–** अमरावती जिल्ह्यातील बड्या नेत्यांनीउमेदवारी कायम ठेवत निवडणूक मैदानात उडी घेतली आहे. हे नेते कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधित आहेत. परंतु, ते आता अपक्ष निवडणूक लढवीत आहेत. त्यामुळे महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतविभागणीचा धोका निर्माण झाला आहे. मतविभागणी रोखण्याचे मोठे आव्हान सर्वच राजकीय पक्षांसमोर आहे.

जिल्ह्यात शेवटच्या दिवशी बंडखोरांना रोखण्यात सर्वच राजकीय पक्षांना अपयश आले. राजकीय पक्षांच्या वरिष्ठांनी आदेश देऊनही इच्छुकांनी माघार घेतली नाही. अपक्ष उमेदवारी करत त्यांनी मित्र पक्षाच्या उमेदवारांविरोधातच दंड थोपटले आहेत. त्यामुळे मतविभागणी होण्याची आता दाट शक्यता आहे.विशेष म्हणजे, बंडखोरी करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील दर्यापूर ,अचलपूर,मोर्शी, मेळघाट,अमरावती,बडनेरा विधानसभा मतदारसंघात चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. बडनेरा मतदार संघात



उबाठा च्या प्रीती बंड या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत.भारतीय जनता पक्षाचे मनपा चे माजी सभापती तुषार भारतीय यांनी महायुतीचे उमेदवार रवी राणा यांच्या विरोधात बंड पुकारले आहे. याशिवाय, अमरावती विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता हे महायुतीच्या उमेदवार सुलभा खोडकेयांच्या विरोधात रिंगणात आहे यामुळे महायुतीच्या उमेदवारांचे टेन्शन वाढले आहे.अचलपूर मध्ये ही भाजप ला भाजपाच्या बंडखोर उमेदवाराचा फटका बसणार आहे तर दर्यापूर मध्ये ही महायुतीचे शिंदे गटाचे उमेदवार अभिजित अडसूळ यांना मोठा फटका बसण्याचे चिन्हे आहेत.यामुळे महायुतीचे टेंशन अधिक वाढलेले आहे.

# शिक्षकांनो, प्रचारात सहभागी होऊ नका! शिस्तभंगाची होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती–** राज्यातील अकृषी विद्यापीठेआणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचारात प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. त्याबाबतचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांना दिले आहेत. उच्च शिक्षण संचालनालयाकडून याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. पहिल्यांदाच असे निर्देश शैक्षणिक संस्था, विद्यापीठांना देण्यात आले आहेत.

राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. त्यानुसार आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. राज्यातील विद्यापीठे व




संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सामाईक परिनियम अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी लागू केल्या आहेत. त्यानुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही. त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही. तसेच कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कामात भाग घेता येणार नाही असे परिपत्रकात नमूद केले आहे.

कलर बॉक्सकठोर कारवाईचा इशाराकोणताही कर्मचारी विधानसभा किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत प्रचार करू शकणार नाही. हस्तक्षेप करू शकणार नाही. त्यासंबंधी आपले वजन खर्च करू शकणार नाही किवा त्यात भाग घेऊ शकणार नाही. त्यामुळे विद्यापीठ किवा संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक कामात,प्रचारात सहभाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट केले आहे.

# कठोरा नाका भागात खळबळ, सलग दोन महिलांचे मंगळसुत्र लुटले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती–** पोलिस ताफा विधानसभा निवडणूकीच्या बंदोबस्तात बिझी असल्याचे पाहून शहरात पादचारी महिलांच्या गळ्यातील मंगळसुत्रलुटणारी टोळी सक्रीय झाली आहे. अशातच अज्ञात लुटारूंनी ८ नोव्हेंबर रोजी रात्री दीड तासाच्या अंतरावर दोन महिलांच्या गळ्यातील सुमारे २ लाख ३० हजार रूपयांचे मंगळसुत्र लंपास केले. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या कठोरा नाका परिसरात ही घटना घडली.

मंगळसुत्र लुटमारीची पहिली घटना कठोरा नाका भागातील शिवार्पण कॉलनी नजीक ९ वाजताच्या सुमारास घडली. तक्रारकर्त्या महिला सायंकाळच्या सुमारास बहीणीसोबत ऑटोने अंबादेवी मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. दर्शन ऑटोपल्यानंतर दोघेही रात्री ९ वाजेच्या सुमारास ऑटोने कठोरा नाका परिसरात आल्या. दोन्ही बहीणी ऑटोमधून उतरल्यानंतर घरी जाण्यासाठी पायदळ निघाल्या असता पूर्वीपासून दुचाकीवर दबा धरून असलेल्या दोन अज्ञात लुटारूंनी अचानक दुचाकीने जवळ येऊन एका बहीणीच्या गळयातील १० ग्रॅम वजनाचे सुमारे ७४ हजार रूपये किमतीचे सोन्याचे मंगळसुत्र लुटले.



मंगळसुत्र लुटमारीची दुसरी घटना प्रेरणा कॉलनीगार्डन समोर घडली. तक्रारकर्त्या महिला या दररोज गजानन महाराज मंदिरात हरीपाठ करण्यासाठी जात असतात. त्या रात्री १०.३० वाजताच्या सुमारास हरीपाठ करून पायदळ घरी जात असताना अज्ञात दुचाकीस्वारांनी त्यांच्या गळयातील २० ग्रॅम वजनाचे १ लाख ५६ हजार रूपयांचे मंगळसुत्र लुटले. दोन्ही घटना घडताच कठोरा नाका परिसरात चांगलीच खळबळ उडाली. माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांचा ताफा तातडीने घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी वॉकीटॉकीवर सर्वत्र नाकाबंदी करून लुटारूंना जेरबंद करण्याचा प्रयत्न केला. परंतु, नेहमीप्रमाणे लुटारू पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरार होण्यात यशस्वी झाले. दोन्ही घटनांबाबत पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# खरिपानंतर आता रब्बी हंगामातील पिकांवर शेतकऱ्यांना आशा!

## सोयाबीनचे उत्पादन झाले कमी: खरीप हंगामाने वाढविले कर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती** – खरीप हंगामातील सोयाबीनचे उत्पादन कमी झाले. त्या तुलनेत सोयाबीनची दरवाढ होणे अपेक्षित होते. मात्र, दिवाळी सणाचा फायदा घेत खासगी व्यापाऱ्यांनी सोयाबीनचे दर कमी केले. त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला असून, आता रब्बी हंगामातील उत्पादन चांगले होईल, या आशेवर शेतकरी आहेत.



कृषिप्रधान देशातील शेतकऱ्यांची आज बिकट अवस्था झाली आहे. शेतकरी नेहमीच अस्मानी आणि सुलतानी संकटात भरडला जातो. उत्पादन खर्च जास्त व त्या तुलनेत उत्पादन कमी, अशी शेतकऱ्यांची विकट अवस्था झाल्याने शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. मात्र, अशा बिकट परिस्थितीतही शेतकऱ्यांनी मोठ्या आशेवर यंदा खरिपात विविध प्रकारे लागवड केली. मात्र, चार महिन्यांचे पीक असलेल्या सोयाबीनचे उत्पादन पाहिजे त्या प्रमाणात झाले नाही. त्यामुळे शेतकऱ्याऱ्यांची होरपळ झाली.

सोयाबीन पिकावर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खर्च केला. मात्र, काही शेतकऱ्याचा खर्चही भरून निघाला नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले. खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच लागवड केल्यानंतर पुरामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. त्यानंतर आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यानी कसेबसे स्वताला सावरत शेती केली. खरीप हंगामातील सोयाबीनचे उत्पादन पाहिजे त्या प्रमाणात झाले नाही, उलटशेतकऱ्यांना त्यांचा मोठा आर्थिक फटका बसला. आता शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहू, चना, ज्वारी आदींची लागवड केली आहे.खरीप हंगामात सोयाबीनचे उत्पादन कमी झाले. त्या तुलनेत दर कमी झाल्याने शेतकरी संकटात सापडले असून, आता रब्बी हंगामातील पिकांवर शेतकरी अवलंबून असून, या हंगामात भरघोस उत्पादन व्हावे आणि चांगला दर मिळावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.

### अस्मानी संकटापुढे शेतकरी हतबल

अस्मानी आणि सुलतानी संकटात शेतकरी नेहमीच भरडला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांनी खरीप हंगामात विविध पिकांची लागवड केली. मात्र, नदी काठावरील शेतीला तीन वेळा पुराचा तडाखा बसला. त्यामुळे शेतकरी पार कोलमडून गेला.

या संकटातून कसेबसे शेतकरी सावरत असतानाच ऐन दिवाळीच्या तोंडावर पाऊस बरसल्याने कापणी केलेली सोयाबीन पीक पावसात भिजले. त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला.

### शेतकऱ्यांना शेतमालाच्या दरवाढीची अपेक्षा

शेतकरी नेहमीच संकटात सापडत असतो; परंतु शेतकयांना संकटातून कायमस्वरूपी बाहेर काढणारी यंत्रणा अजूनही अस्तित्वात आली नाही. शेतकऱ्याच्या घरी सुख, समृद्धी येण्यासाठी शेतमालाची दरवाढ व्हावी, अशी आशा शेतकऱ्यांना आहे.–

# कॅशलेस व्यवहारांना गावागावांत वाढली पसंती !

## छोट्या विक्रेत्यांकडेही स्मार्ट पेमेंटची सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० मोर्शी ८**

संपूर्ण भारतात डिजिटल पेमेंट इको सिस्टीममुळे आपल्या रोजच्या जगण्यातील व्यवहाराची पद्धत बदलली आहे. शहरातील ग्रामीण भागातील चहा, किराणा दुकान, भाजीपाला, भंगारवाला, चायनीज कॉर्नर, इतर व्यवसाय किंवा मोठ्या शोरूममध्येही यूपीआयद्वारे ऑनलाइन व्यवहार होत असल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

व्यवहारातील साध्या एक रुपयापासून लाखो रुपयांचे व्यवहार स्मार्ट पेमेंटद्वारे कैशलेस करत आहेत. त्यामुळे घरात किंवा खिशातदेखील रोख रक्कम ठेवणे नागरिक टाळत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील ग्रामीण परिसरात सुट्या पैशांचे टेन्शन



मिटले आहे. छोट्या विक्रेत्यांकडेही स्मार्ट पेमेंटची सुविधा उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागात आधार कार्डवरून संकेतील पैसे काढून दिले जातात, परंतु, घरात मोबाइल सुविधा असल्याने वीज मीटरचे बिल, टेलिफोन बिल, ट्रॅव्हल कंपन्यांचे विमानाचे, रेल्वेचे तिकीट, सिलिंडरची रक्कमदेखील ऑनलाइन व्यवहारांद्वारे स्वीकारण्यास सुरुवात झाली. त्याचबरोबर ग्रामीण परिसरातील चहा, किराणा दुकान, भाजीपाला, भंगारवाला, चायनीज कॉर्नर, इतर व्यवसायासाठी नापर वाढला आहे. परिणामी, सुट्या पैशांचे टेन्शन दूरच झाले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### काय आहे यूपीआय?

यूपीआय ही भारतीय पेमेंट सिस्टीम आहे.नॅशनल पेमेंट कॉपरिशन या सरकारी कंपनीने ते विकसित केले आहे. त्याची ग्रास गोष्ट म्हणजे पेमेंट करण्यासाठी ओटीपीची गरज नाही. तुम्ही फक्त पिन टाकून, कोड स्कॅन करून सहज पेमेंट करता येते. त्यामुळे बहुतांश जण यूपीआयचा वापर करत असल्याचे दिसून येत आहे.

# प्रचारातही भाऊबीजेची ओवाळणी जोमात सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती –** विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असून पक्ष-अपक्ष उमेदवार गावागावांत जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. अशातच भाऊबीज सण आल्याने महिलांकडून औक्षणही करून घेत आहेत.औक्षणाच्या निमित्ताने महिला भगिनींना ओवाळणीसुद्धा मिळत असल्याने उमेदवार भाऊंना आपले एकेक मत पक्के होत असल्याचे समाधानही मिळत आहे. आता गावांमध्ये निवडणुकीचा प्रचार जोमात सुरू आहे.गावांमध्ये उमेदवारांच्या प्रचाराचा ताफा पोहोचताच समर्थकांकडून औक्षण केले जाते. त्याबदल्यात उमेदवार तसेच नेत्यांकडून ओवाळणी दिली जाते.




सणासुदीत भेटीगाठीसणासुदीच्या काळात निवडणूक आल्याने गावांमध्ये प्रचाराला वेग आलेला आहे. सणासुदीच्या काळात अनेकजण स्वगावी आल्याने भेटीगाठी झाल्या. तसेच राजकीय स्थितीवर चर्चा सुद्धा रंगल्या. गावांमध्ये निवडणुकीच्या स्थितीबाबत तसेच राजकीय पक्षांचे कोणत्या भागात प्राबल्य आहे. यावरही चर्चा रंगताना दिसून येत आहेत.

# शुभकार्यांसाठी आता तुळशी विवाहाचे वेध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती** हिंदू परंपरेनुसार तुळशी विवाहानंतर शुभकार्याला सुरुवात केली जाते. तुळशी विवाहामुळे वैवाहिक जीवनातील ठाणतणाव, संघर्ष आणि समस्या दूर होत असल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे दिवाळी सणातील लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, भाऊबीज पार पडल्यानंतर आता नागरिकांना तुळशी विवाहाचे वेध लागले आहे.

कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या द्वादशी तिथीला तुळशी विवाहसाजरा केला जातो. या दिवशी तुळशीचा विवाह कृष्णा सोबत करतात, यंदा तुळशी विवाह १२ की, १३ नोव्हेंबरला याबाबत अनेकांत संभ्रम आहे.



### तुळशी विवाहासंबंधीच्या लोकमान्यता

धार्मिक मान्योनुसार तुळशीला पुजनीय मानले जाते. शालानुसार तुळसीची पूजा केल्याने आणि संध्याकाळी तुकशौसमोर तुपाचा दिवा लावल्याने घरात सुख-शांती टिकून राहते. घरातील आर्थिका स्थिती देखील चागली राहते. तुळशी विवाह केल्याने वैवाहिक जीवनात येणारे अडथळे दूर होतात. पती-पत्नीच्या नात्यात जिव्हावा वाली शिवाय नातेही घट्ट होतात, अशा लोकमान्यता आहेत.

पंचांगानुसार, कार्तिक महिन्याची शुक्ल पक्ष एकादशी ११ नोव्हेंबरला सायंकाळी ६ ४७ मिनिटांनी शुरू होईल, शिवाय १२ नोव्हेंबरला दुपारी ४ ३ मिनिटांनी समाप्त होईल. त्यामुळे १२ नोव्हेंबरला कार्तिकी एकादशी साजरी होणार आहे.

# नोव्हेंबरमध्ये तापमानाचा पारा होतोय हळूहळू कमी

## पहाटेला फिरणाऱ्यांची संख्या वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती** नोव्हेंबर महिना सुरू झाल्यापासून तापमानात चढउतार होत आहे. गुरुवारी कमाल तापमान ३३ अंश डिग्री सेल्सिअसवर गेले होते. तर किमान तापमान १९ अंश सेल्सिअस होते.दरम्यान, पुढील आठवडाभर सारखेच तापमान राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दिवसा ऊन आणि सायंकाळी पावसाच्या हलक्या व दमदार सरी, असेही वातावरण राहिले. विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच एकेक अंश सेल्सिअसने तापमानकमी होत असल्याने रात्रीच्या वेळी थंड हवा आणवू लागली आहे. नोव्हेंबर महिना सुरू झाला तोच रात्रीला काही प्रमाणात थंडी वाजत आहे. तापमानाचा पारा कमी झाल्याने रात्री थंडीचे प्रमाण वाढले आहे. बोचऱ्या थंडीचा अनुभव रात्रीच्या सुमारास गडचिरोली येत आहे. थंडी पडण्यापूर्वीच शहरातील रस्त्याच्या बाजूला स्वेटर विक्रेत्यांनी आपले बस्तान मांडले आहे. स्वेटर, जर्किन, मफलर, हातमोजे व कानटोपी आदी ऊबदार कपड्यांची विक्री होत आहे.

# राष्ट्रसंतांच्या भूमीत योगींची भाषा विष पेरणारी

## मल्लिकार्जुन खरगेआपल्या खास शैलीत घेतला विरोधकांचा समाचार

### काँग्रेसचे देशासाठी बलिदान आणि योगदान सर्वश्रुतजाहीर सभेत नागरिकांची अलोट गर्दी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०गुरुकुंज मोझरी**

जगाला सर्वधर्म समभावाचा संदेश देणारे आणि ग्रामगीतेतून देशात एकता निर्माण करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भूमीत 'बटेंगे तो कटेंगे' सारख्या विषारी घोषणा देणाऱ्या योगींच्या तोंडून अशी भाषा शोभत नाही.योगी म्हणजे मुखात राम आणि बगल मध्ये सुरी अशी लक्षणे तर ढोंगी साधूंची असल्याचा पलटवार अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.गुरुदेवनगर गुरुकुंज मोझरी येथे शनिवारी यशोमती ठाकूर यांच्यासह महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी मोहन प्रकाश, खा. बळवंत वानखडे,माजी खा. अनंत गुढे,तिवसा येथील महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर, डॉ. सुनील देशमुख (अमरावती विधानसभा) प्रा. वीरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे विधानसभा),डॉ.हेमंत चिमोटे (मेळघाट विधानसभा),बबलू देशमुख (अचलपूर विधानसभा) गिरीश करळे (मोर्शी, वरुड विधानसभा) सुनील खराटे (बडनेरा विधानसभा),गजानन लेवटे (दर्यापूर विधानसभा) यांचेसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी विरोधकांचा खरपूस समाचार घेतांना खरगे म्हणाले की, राष्ट्र एकसंघ राहण्याकरिता प्रयत्न करणाऱ्या काँग्रेसचे मोठे बलिदान आहे. आरएसएस, भाजपने स्वातंत्र्यासाठी काय केले, भारताचा इतिहास लक्षात घेता काँग्रेसचे योगदान आणि बलिदान दिसून येते.इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी बलिदान दिले. आम्ही संविधानावर चालणारे लोकं आहोत मात्र विरोधकांची भाषा संविधान तोडणारी मनुस्मृती भाषा आहे.जुमलेबाज मोदी सरकारने ना पंधरा लाख दिले नाही वर्षाला दोन कोटी नोकऱ्या दिल्या,ना शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट केले. याउलट शेतीमालाचे भाव कमी झाले, बेरोजगारी वाढली, देशात अराजकता निर्माण केली.काँग्रेसने संविधान वाचवून लोकशाही जिवंत ठेवल्यामुळे आज मोदी प्रधानमंत्री झाले असे सांगून खरगे यांनी आज संविधान वाचविण्याची गरज असल्याचे नमूद केले. संविधान असेल तर देशातील नागरिकांचे हक्क सुरक्षित आहेत त्यामुळे तोडण्याची भाषा करणाऱ्या व मनुस्मृतीवर चालणाऱ्या लोकांना त्यांची जागा दाखवून द्या व महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन केले. गुरुकुंज मोझरी येथे झालेल्या जाहीर सभेला महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेला नागरिकांची मोठ्या संख्येने गर्दी होती. या सभेने विरोधकांचे धाबे दराने अशी चर्चा सभास्थळी होती.

**नेत्यांनी मर्यादा जपावी–** उठसुठ कुणीही काहीही बोलतात, पदाची गरीमा न ठेवता तसेच पक्षाची विचारसरणी झुगारून आज मोदींपासून ते स्थानिक नेत्यांपर्यंत विषारी भाषेचा वापर करतात. काल, परवा येथील एका मुलीने खासदाराला चपराशी संबोधले. यावरून त्यांच्या संस्काराची प्रचिती येते. बळवंत वानखडे यांना संविधानाने खासदार बनविले. बळवंत वानखडे हे जनतेचे, देशाचे, महापुरुषांचे शिपाई आहेत. उलट असे वक्तव्य करणाऱ्यांनी स्वतः अवलोकन करावे असे बोलल्यानेच आपण एकदा जेलवारी सुद्धा केलेली आहे त्यामुळे आपण भाषेचा योग्य वापर करावा व बोलतांना, काम करतांना आपली मर्यादा जपावी असा इशारा देत मल्लिकार्जुन खरगे यांनी नवनीत राणा यांना मर्यादित राहण्याचा सल्ला दिला.

#### हे फसनवीस सरकार –यशोमती ठाकूर

विद्यमान राज्यसरकारने जनतेची फसवणूक केली आहे.हे केवळ मतांसाठी शासनाच्या तिजोरीचा वापर करत असून फसव्या योजना राबवित आहेत. महिला असुरक्षित असून युवक बेरोजगार झालेत, शेतीमालाला भाव न देता त्यांचीही फसवणूक केली. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या चिंतनाचा विषय आहे. वाढत्या महागाईने सर्वसामान्य जनता हवालदिल झाली आहे आणि हे फसनविस सरकार लोकांना जातीपातीच्या राजकारणात अडकवून ठेवत आहे.खोटे आमिषे दाखवून युवकांना फसविण्याचे प्रकार हे सरकार करत आहे अशी टीका करून यशोमती ठाकूर यांनी महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सर्व समस्यांवर निघेल असे उपस्थितांना आश्वासन दिले.

#### ये शेरनी है,किसिसे डरती नही

महाविकास आघाडीच्या उमेदवार व काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर या चवथ्यांदा मोठ्या मताधिक्याने निवडून येतील. त्यांनी मतदार संघात विविध योजना आणून सर्वच क्षेत्राचा विकास केला. त्या अतिशय योग्य उमेदवार असून यापुढेही त्या तुमच्या सेवेत राहून उत्तम काम करतील. तुमचा आशीर्वाद देऊन व तुमच्या मतांचा योग्य वापर करून यशोमती ठाकूर यांना निवडून द्या.यशोमती ठाकूर या नुसत्या उमेदवार नाहीत तर त्यांचे काँग्रेस पक्षासाठीही मोठे योगदान आहे. त्यांचे कामच त्यांचा धर्म आहे, लढाऊ महिला म्हणून त्या सर्वश्रुत असतांना ये शेरनी है किसिसे डरती नही असे म्हणत यशोमती ठाकूर यांचे भरभरून कौतुक केले.



# बडनेरा मतदार संघात तुषार भारतीय यांचा संवाद झंझावात

## परिवर्तनाची हाक देऊन भेटि-गाठी ;मतदारांकडून भरघोस प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

बडनेरा विधानसभा मतदार संघाचे स्वाभिमानी व जन उमेदवार श्री तुषार भारतीय यांच्या संवाद बैठकांचा झंझावात सुरु असून त्यांच्या प्रचाराला मतदारांकडून भरघोस प्रतिसाद मिळत असल्याने यंदा परिवर्तन निश्चित यावर शिक्कामोर्तब झाले आहे. विकास पासून कोसो दूर राहिलेल्या व नानाविध समस्यांनी ग्रस्त बडनेरा मतदार संघात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी नागरिकांनी आपला मतरुपी आशीर्वाद मला द्यावा, मतदारांच्या प्रत्येक मताचे मोल राखुन त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुण देण्यास मि सदैव कटिबद्ध राहिल. असा शब्द यावेळी तुषार भारतीय यांनी मतदारांना दिला.

निवडणूक प्रचार नियोजन श्रुंखलेत शनिवारी बडनेरा,चवरे नगर, महादेव खोरी, गोपाल नगर, पार्वती नगर, स्वस्तिक नगर, गडगडेश्वर परिसर, यशोदा नगर, कुंभारवाडा, नवाथे, अंबिका नगर, मोती नगर परिसरात तुषार भारतीय यांच्या संवाद बैठकां पार पडल्या. दरम्यान तुषार भारतीय यांचे ठीक–ठिकाणी मोठ्या जल्लोषात स्वागत होत असल्याने विरोधकांचे प्रेशर वाढले आहे. यंदा बडनेरा मतदार संघात परिवर्तन निश्चित असून प्रेशर कुकरच आघाडीवर आहे.

# सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ उद्याला शिवसेना नेत्या सुषमा अंधारेंची जाहीर सभा

## फ्रेजरपुरा येथील सभेत करणार विरोधकांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती–** बडनेरा विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ शिवसेनेची मुलुखमैदानी तोफ,फायरब्रॅन्ड नेत्या सुषमा अंधारे यांची जाहिरसभा उद्या सोमवारी (दि.११ नोव्हें) अमरावती येथे पार पडणार आहे. सुनील खराटे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांना अधिक बळ देण्यासाठी सुषमा अंधारे या मैदानात उतरल्या आहे. फ्रेजरपुरा येथील सिद्धार्थ क्रीडा मंडळ मैदानावर सोमवारी सायंकाळी ६ वाजता या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. बडनेरा मतदार संघात सुनील खराटे हे शिवसेनेचे अधिकृत उमेदवार असून सध्या बडनेरा मतदार संघात खराटे यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतलेली आहे. दोन दिवसांपूर्वी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची जाहीर सभा झाल्यानंतर बडनेरा मतदार संघातील मतदारांचा कौल सुनील खराटे यांच्या बाजूने आहे यामध्ये आणखी भर टाकण्यासाठी तसेच सुनील खराटे यांचे हात अधिक मजबूत करण्यासाठी सुषमा अंधारे या देखील रणांगणात उतरल्या आहे.या जाहीर सभेला त्यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व नेते व पदाधिकारी देखील उपस्थित असणार आहेत. उल्लेखनिय आहे की,सुषमा अंधारे या सुनील खराटे यांना आपला लहान भाऊ मानतात.सदैव भावाच्या पाठीशी असणाऱ्या सुषमा अंधारे यांनी या विधानसभा निवडणूकितआपल्या भावाला साथ देण्यासाठी बडनेरा मधील मतदारांना त्या साद घालणार आहे.सुषमा अंधारे यांच्या शब्दांची तोफ रविवारी विरोधकांचे वस्त्रहरण करणार असून सुषमा अंधारे यांचे विचार ऐकण्यासाठी महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी तसेच बडनेरा मतदार संघातील नागरिकांनी सोमवारी सायंकाळी ६ वाजता फ्रेजरपुरा येथील सिद्धार्थ क्रीडा मंडळ मैदान येथे उपस्थित राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीचे बडनेरा मतदार संघाचे उमेदवार सुनील खराटे यांनी केले आहे.



# भातकुली मध्ये प्रितिताई बंड यांच्या प्रचार कार्यालयाचे उदघाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०भातकुली** – बडनेरा विधानसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ च्या अपक्ष उमेदवार प्रितीताई संजय बंड यांच्या भातकुली तालुका निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन समारंभ बुधवार ८ नोव्हेंबर सायंकाळी ६ वाजता बुथ कमर्शियल मार्केट, बस स्टॅन्ड भातकुली येथे पार पडला. यावेळी मंचावर माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, नानाभाऊ नागमोते, मनोहर बुध, गटनेत्या सोनाली संतोष शिंदे, प्रविण अळसपुरे, रहेमत खॉ पठाण, मुतल्लीभाई, गफ्फारभाई, अज्जुभाई, बशिरभाई, वासुदेव मेश्राम, बद्रीनाथ भोपसे, अनिताताई पारसे, देवानंद शिरसाठ, गजानन इंगळे, तुषार देशमुख, दीपक गावंडे, गणेश बांबल, डॉ. सुरेश रेहपाडे, प्रल्हाद रेहपाळे, सुरेश सिंह ठाकुर गुरुजी, म. गुलाम नभी, रहेमत खॉ यावलीकर, गजानन धनवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंचावर उपस्थितीत सर्व मान्यवरांचीभाषणे झाली. यावेळी प्रितीताई बंड म्हणाल्या गेल्या पंधरा वर्षात बडनेरा मतदार संघात कुठलाही विकास न झाल्यामुळे सर्वसामान्यांना जनता हैराण झाली आहे. जर या बडनेरा मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलायचा असेल तर मला मतदान रुपी आशीर्वाद देऊन तुमची प्रतिनिधीम्हणुन मला आमदार बनवून विधानसभेत पाठवा असे आवाहन प्रितीताई बंड यांनी यावेळी आपल्या भाषनात केले. यावेळी मतदारसंघातील प्रितीताई संजय बंड यांचा चाहता वर्ग तसेच कार्यकर्ते व पदाधिकारी हजारोच्या संख्येने उपस्थित होते.



# शहरात १२ नोव्हेंबरला भव्य नगर कीर्तन यात्रा

## प्रकाश पर्वावर गुरुद्वारा श्री गुरुसिंघचे आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती–** दशम गुरु परंपरेचे आद्य गुरु श्री गुरुनानकदेवजी यांच्या ५५५ व्या प्रकाश पर्व जन्मोत्सवानिमित्त स्थानिक बुटी बुरी प्लॉट स्थित गुरुद्वाराश्री गुरुसिंघ सभाद्वारा ४ नोव्हेंबरपासून दररोज शहरातील विविधी भागात प्रभात फेऱ्यांचे आयोजन केले जात आहे. याअंतर्गत १२ नोव्हेंबरला भव्य नगर किर्तन यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती शनिवारी पत्रकार परिषदेत देण्यात आली.

भव्य नगर किर्तन यात्रेमध्ये इंटरनॅशनल निशान ए खालसाचा जत्था तसेच अमृतसरची गतका पार्टी विशेष आकर्षणाचेकेंद्र राहणार आहे. नगरकिर्तनमध्ये शहीद संत संगतसिंहजी यांचे नातू वीर मन्नीसिंहजी सहभागीहोणार असल्याचेही गुरुद्वारा श्रीगुरुसिंघसभा आयोजन समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. १२ नोव्हेंबरला दुपारी १२.३० ते २.३० पर्यंत गुरुचे लंगर आयोजित केले आहे. त्यानंतर २.३० वाजतापासून नगर किर्तनाला सुरुवात होईल. ही नगर किर्तन यात्राबुटी प्लॉट स्थित गुरुद्वारापासून प्रारंभहोवून राजापेठ, राजकमल चौक, शाम चौक, सरोजचौक, जयस्तंभ चौक, शामचौक व राजकमल चौक येथून पुन्हा बुटी प्लॉट येथील गुरुद्वारा वर पोहचणार आहे. येथे संध्याकाळी ७ ते रात्री१० वाजेपर्यंत गुरुचा लंगर आयोजित केला आहे. यानंतर १३ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत रोज सकाळ संध्याकाळी मुकेश सिंह जी, भुपिंदरसिंहजी, तसेच शहीद संत संगतसिंह यांचे नातू विर मन्त्रीसिंह यांच्याद्वारा किर्तन दिवान सादर करण्यातयेईल. १३ नोव्हेंबरला सकाळी ९.३० वाजता अखंड पाठ साहेबला आरंभ होईल. याचा समारोप १५ नोव्हेंबरला सकाळी ९.३० वाजता श्री सुखमनी साहिबजी यांच्या पाठ नंतर करण्यात येईल. यादरम्यान १३ नोव्हेंबरला रात्री मुलांचा कवी दरबार रंगणार आहे. १५ नोव्हेबरला सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत रक्तदान शिबीर आयोजित केले आहे. या कार्यक्रमामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले. पत्रकार परिषदेला गुरुद्वारा श्री गुरुसिंघ सभेचे अध्यक्ष तजिंद्रसिंह उबोवेजा, सचिव प्रल्हादसिंह साहनी तसेच शरणपालसिंह अरोरा, हरबख्शसिंह उबोवेजा, जगदीश छाबडा, नरेंद्रसिंह अरोरा, मनजितसिंह टिंकू होरा, अजिंद्रसिंहराजू मोंगा, परमजितसिंह साहनी, रिंकू जग्गा, परविंदरसिंह साहनी, नवलजीतसिंह उबोवेजा, सतींदरसिंह लोटे, राजू सलूजा, गिरीश सावल आदी उपस्थित होते.

# उद्याला शहरात भव्य मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती–** विधानसभा सार्वत्रिक निवडणुक–२०२४ च्या अनुषंगाने व्यापक मतदान जनजागृती करीता प्रशासना बरोबर विविध स्वयंसेवा संस्था, व्यापारी, व्यावसायीक, औद्योगिक, शिक्षक, कर्मचा–यांची व इतर संघटना पुढे येवुन आपला सहभाग नोंदविण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारीत निश्चित वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून.जिल्हाधिकारी अमरावती,मुख्य कार्यकारी अधिकारी व महानगरपालिका अमरावती मार्फत अमरावती शहरातुन भव्य मतदान जनजागृती रॅली दिनांक ११/११/२०२४ दुपारी ४.०० वाजता नेहरु मैदान पासुन जिल्हा स्टेडीयम अमरावती पर्यंत आयोजीत केलेली आहे. सदर मतदान जनजागृती रॅलीची सुरुवात नेहरु मैदान येथुन होणार असून राजकमल चौक मार्गक्रमण करत जिल्हा स्टेडीयम अमरावती येथे रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे.

या रॅलीमध्ये अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी सहभागी होवून मतदान जनजागृती करीता सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी नागरीकांना आवाहन केले की, प्रत्येक नागरीकाने आपला मतदानाचा अधिकार बजवावा. येणा–या २० तारखेला नागरीकांनी उस्फुर्तपणे मतदान करुन निवडणुकीत आपला सहभाग नोंदवावा.

विधानसभेचे दूत बनून मनपा क्षेत्रातील मतदारांना मतदानास येण्याचा आग्रह धरावा. अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात मतदान होण्याकरीता सर्वांनी मिळून प्रयत्न करावे.

देश घडविण्यासाठी प्रत्येकाने मतदान करणे गरजेचे आहे. विधानसभेत प्रत्येक मताला महत्त्व असल्याने कोणत्याही प्रलोभनाला आणि दबावाला बळी न पडता नागरिकांनी मतदान करावे असे आवाहनही मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले.




# कार्यकर्त्यांना सुगीचे आले दिवस : गाड्यांसह मेजवानी : कार्यकर्त्यांमुळे प्रचाराला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

शहर, ग्रामीण भागात सध्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. राजकीय पक्षांना प्रचारासाठी कार्यकर्ते मनधरणी करावी लागत आहे. त्यामुळे आहेत त्या कार्यकर्त्यांना सुगीचे दिवस आले आहेत.



राजकीय पक्षांच्या उमेदवारांना कार्यकर्त्यासाठी सकाळ, सायंकाळसाठी सर्व व्यवस्था करावी लागत आहे. त्याचबरोबर मेजवानीही द्यावी लागत आहे. प्रचारात बाईकसह सहभागी होण्यासाठी, घराघरांमध्ये माहितीपत्रक वाटण्यासाठी, प्रचार फेरीत झेंडे तसेच उमेदवाराचे फोटो असलेले फलक धरण्यासाठी कार्यकर्त्यांची गरज असून, त्यांनागोळा करताना राजकीय पक्षांच्या उमेदवारांची कसरत होत आहे. विभागप्रमुख, विधानसभा स्तरावरील प्रमुखावर व्यवस्थापनाची कार्यकर्त्यांच्या जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यानुसार वॉर्ड अध्यक्ष व महिला वॉर्ड अध्यक्ष स्तरावर प्रचाराचे नियोजन केले जात आहे. महिला कार्यकर्त्यांसह ज्येष्ठ नागरिक प्रचारात उतरत आहेत. मोहाडी-तुमसर मतदारसंघामध्ये सध्या महाविकास आघाडी व महायुती तसेच ज्याने बळकट केले माझे मनगट त्यालाच पडणार अपक्ष उमेदवारांच्या फेऱ्या काढल्या जात आहेत. राजकीय पक्ष त्याशिवाय अपक्ष उमेदवारांच्या नेत्यांना कार्यकर्त्यांची जमवाजमव करावी लागत आहे. अपक्ष उमेदवारांची तर कार्यकर्ते गोळा करताना दमछाक होते आहे. सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत उमेदवार प्रचार करत आहेत. प्रचार फेऱ्यांमध्ये गृहिणी तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होताना दिसत आहेत. नोव्हेंबर महिना लागला तरी राजकीय वातावरणासह दिवस दिवसा उन्पचे चटके बसत आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांचा घाम निघत आहे. डोक्यावर आलेल्या उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून कार्यकर्त्यांना टोप्यांचे वाटप केले जात आहेत.

# आता घरपोच मिळेल हयात दाखला

## पेन्शनधारकांना दिलासापचाही पर्याय उपलब्ध

### इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या माध्यमातून सेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

ज्यांना सरकारी पेन्शनचा लाभ मिळतो, अशा प्रत्येकाला दरवर्षी नोव्हेंबर ते डिसेंबर या दोन महिन्यांच्या कालावधीत पेन्शन जमा करणाऱ्या बँकेत जाऊन हयातीचा दाखला द्यावा लागतो. यासाठी आता टपाल खात्याने घरपोच जीवन प्रमाणपत्र (डिजिटल जीवन प्रमाणपत्र / हयातीचा दाखला) सुविधा सुरू केली आहे.

हयातीचा दाखला म्हणजेच पेन्शन घेणारी व्यक्ती जिवंत आहे, याचा हा पुरावा असतो. हा दाखला बँकेत सादर केला नाही, तर बँक पेन्शनधारक व्यक्ती मृत पावली आहे, असे समजून पेन्शन जमा करणे बंद करू शकते. त्यामुळे हा दाखला वेळेत बँकेत सादर करणे अत्यावश्यक आहे. परंतु, हा दाखला मिळविण्यासाठी पेन्शनधारकांना बँकेत वारंवार चकरा - माराव्या लागतात. विशेषतः वयोवृद्ध, अपंग पेन्शनधारकांना मोठा त्रास सहनकरावा लागतो. शिवाय ग्रामीण भागातील पेन्शनधारकांना, तर याबाबत फारशी काही माहितीही नसते. त्यामुळे हा दाखला मिळविताना अनेकांची मोठी अडचण होते.ही अडचण लक्षात घेऊन टपाल विभागाने पोस्ट पेमेंट बँकेमार्फत आता ही घरपोच दाखल्याची सुविधा सुरू केली आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत पेन्शनधारकांसाठी हामोठा दिलासा ठरणार आहे. य सुविधेचा लाभ घेण्यासाठी पेन्शन त्यांच्या पोस्टमन किंवा जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधू शकतात याशिवाय 'पोस्ट इन्फो' हे ॲप डाऊनलोड करून त्यामध्ये 'सर्व्हिस रिक्वेस्ट' हा पर्याय वापरून त्यांच जीवन प्रमाणपत्रासाठीची विनंती नोंदव शकतात. या विनंतीप्रमाणे पोस्टमनन पेन्शनरच्या घरी येऊन आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरणाद्वारे जीवन प्रमाणपत्र जारी करेल. विशेषा म्हणजे, हा लाभ मिळविण्यासाठी पेन्शनर पोस्ट ऑफिसचा ग्राहक असायलाच हवा, असे कुठलेही बंधन नाही. त्यामुळे कुठलाही पेन्शनधारक या सुविधेचा लाभ घेऊ शकणार आहे.



### ही माहिती आवश्यक

हा लाभ मिळविण्यासाठी पेन्शन- धारकाकडे पेन्शनचा प्रकार (उदा. सर्व्हिस पेन्शन, फॅमिली पेन्शन आदी.), पेन्शनचा विभाग, पेन्शन मिळणाऱ्या बँक/पोस्ट ऑफिसचे नाव, पेन्शन पेमेंट ऑर्डर (PPO) क्रमांक, पेन्शन ज्या बैंक / पोस्ट ऑफिस खात्यात जमा होते तो खाते क्रमांक, स्वतःचा मोबाइल नंबर आणि आधार क्रमांक याची माहिती असणे आवश्यक आहे.

# बेलपुरा, बापटवाडी, कल्याण नगर, छाबडा प्लॉट परिसरात आपला मुलगा आपल्या दारी यात्रेला प्रचंड प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

बडनेरा विधानसभा मतदारसंघातील भाजप शिवसेना शिंदे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष रिपाई आठवले पिरिपा कवाडे लहूजी शक्ती सेना शेतकरी संघटना महायुतीचे राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या पदयात्रेला मोठी गर्दी उसळत आहे. बेलपुरा, बापटवाडी, कल्याण नगर, छाबडा प्लॉट, मुरलीयार नगर, सावता कॉलनी, प्रशांत नगर येथे आपला मुलगा आपल्या दारी यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या भागात रवी राणा यांच्या पुढाकाराने ६० कोटीची विकास कामे केल्याबद्दल परिसरात समाधान व्यक्त केल्या जात आहेत. लोक त्यांच्या पदयात्रेत स्वयंस्फूर्तीने सहभागी होत आहे. रवी राणा यांची पदयात्रा आली, तिथं त्यांना लाडक्या बहीणी ओवाळणी घालून आशीर्वाद देत आहे. मातृ शक्ती पाठीवर मायेची थाप देत आहे. रवी राणाचा पाणा चिन्हाची चर्चा संपूर्ण बडनेरा मतदारसंघात होत आहे. संपूर्ण पाच वर्ष सतत आपल्या मतदारसंघात दारोदारी फिरून दांडगा जनसंपर्क ठेवणारे रवी राणा यांच्या पुढाकाराने बडनेरा मतदारसंघातील प्रत्येक क्षेत्रात, गावा गावात विकास कामे करण्यात आली आहे. बेलपुरा, बापटवाडी, कल्याण नगर, छाबडा प्लॉट, मुरलीयार नगर, सावता कॉलनी, प्रशांत नगर परिसरात मातृ शक्ती पितृ शक्ती, सर्व लाडक्या बहीणी, युवा वर्ग यांनी रवी राणा यांना प्रचंड मताधिक्याने निवडूण आणण्याचा निर्धार केला आहे.




# जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्याचा टाईमटेबल ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

जिल्हा परिषद शिक्षकांच्या दरवर्षी लांबणाऱ्या बदल्यांचे ससेमिरा आता कायमचा बंद होणार आहेत.त्यानुसार पुढे एकाच वेळापत्रकानुसार अमरावतीसह राज्यभरातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्याची प्रक्रिया ही ३१ मे पर्यत पूर्ण केली जाणार आहे. शिक्षक बदल्याबाबतचे वेळापत्रक ७ नोव्हेंबर शासनाकडून जारी केले आहे.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठीचे सुधारित धोरण १८ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार निश्चित केले आहे. त्यानुसार तसेच यापूर्वी शासनाने वेळोवेळी तयार केलेल्या धोरणानुसार शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांची प्रक्रिया ऑनलाईन पोर्टलव्दारे राबविण्यात येते.परंतु, नागपूर उच्च न्यायालयात दाखल अवमान याचिकेवरील २५ ऑक्टोबरच्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने बदल्यांसाठीचे ऑनलाइन पोर्टल हे संपूर्ण बदली प्रक्रियेदरम्यान संपूर्ण राज्यासाठी दिलेल्या वेळापत्रकानुसारच कार्यान्वित असावे असे निर्देश दिलेले आहेत.त्यानुसार यापुढे दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या जिल्हांतर्गत बदली प्रक्रियेसाठी सर्वसाधारण संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण होऊन शाळांमधील शिक्षकांची संख्या निश्चित झाल्यानंतर,संबंधित जिल्हा परिषदेने ऑनलाईन बदली प्रक्रियेसाठी आवश्यक माहितीची पूर्वतयारी करण्याची प्रक्रिया सुरू करावी,तसेच जिल्हा परिषदेने अवघड क्षेत्र घोषित अथवा घोषित क्षेत्र प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी,त्यानंतर दरवर्षीच्या वेळापत्रकानुसार जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया राबविण्यात यावी, वेळापत्रक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी संबंधित झेडपी सीईओंवर राहणार आहे. संबंधित वेळापत्रकानुसार पोर्टल व्यवस्थितरीत्या सुरू ठेवण्याची जबाबदारी मे. विन्सीस आयटी प्रा. लि. पुणे या कंपनीची राहणार आहे. एखाद्या वर्षी काही अपरिहार्य कारणास्तव बदली प्रक्रिया राबविणे शक्य नसल्यास व तसे शासनाने स्वतंत्रपणे कळविल्यास त्या विशिष्ट वर्षासाठी संबंधित वेळापत्रक लागू राहणार नाही. तसेच एखाद्या शिक्षकाने चुकीची माहिती भरून शासनाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी, असे देखील नमूद केले आहे.




### असे आहे वेळापत्रक

१ जानेवारी ते २८ फेब्रुवारी शिक्षकांच्या याद्या प्रसिध्द करणे,उपलब्ध रिक्त जागा निश्चित करणे १ ते ३१ मार्च,बदलीसाठी आवश्यक सर्व डेटा झेडपीने संबंधित कंपनीस उपलब्ध करून देणे १ ते २० एप्रिल,समानिकरणांतर्गत रिक्त पदे निश्चित करणे २१ ते २७ एप्रिल,विशेष संवर्ग शिक्षक भाग १ मधी रिक्त जागा घोषित करणे २८ एप्रिल ते ३ मे,विशेष संवर्ग भाग २ मधील शिक्षकांच्या रिक्त जागा घोषित करणे ४ ते ९ मे,बदली अधिकार प्राप्त शिक्षकांसाठी रिक्त जागा घोषित करणे १० ते १५ मे,बदलीपात्र शिक्षकांच्या बदल्यासाठी रिक्त जागा घोषित करणे १६ ते २१ मे,विस्थापीत शिक्षकांसाठी बदल्यासाठी रिक्त जागा घोषित करणे २२ ते २७ मे आणि अवघड क्षेत्रातील रिक्त जागा भरणे २८ ते ३१ मे

# हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्यास फरकाची रक्कम सरकार देणार : देवेंद्र फडणवीसांचे शेतकऱ्यांना वचन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

मागच्या काळात कापूस, सोयाबीनचे भाव कोसळले. यातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी भावांतर योजना आणली. हेक्टरी पाच हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांना दिली. आम्ही एवढ्यावरच थांबलो नाही. येत्या काळात हमीभावापेक्षा कमी दर शेतकऱ्यांना मिळाल्यास यातील फरकाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणार, असे वचन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. या वचनामुळे पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अमरावती जिल्ह्याच्या बडनेरा विधानसभा मतदारसंघातील महायुतीसमर्थित उमेदवार रवी राणा यांच्या प्रचारार्थ गोपालनगरात सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला संबोधित करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी हितासाठी कटिबद्ध असल्याचे वचन दिले. शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय सरकारने घेतला असल्याचेही सांगितले. व्यासपीठावर गुजरातचे मंत्री ऋषिकेश पटेल, खासदार डॉ. अनिल बोंडे, मध्य प्रदेशचे माजी आमदार आत्माराम पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.



**दिवसा शेतात काम करीत असतानाच सिंचन करणे शक्य**

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांसाठी मोफत विजेचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी ही वीज पुरविली जाईल. रात्री शेतावर पाणी देण्यासाठी जाण्याचीही गरज पडणार नाही. दिवसा शेतात काम करीत असतानाच सिंचन करणे शक्य होईल. कारण दिवसा १२ तास वीज शेतकऱ्यांना मिळणार आहे. हे प्रत्यक्षात आणण्यासाठी वेगळी कंपनीच उभारली असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

**महिलांना तिकिटात सवलतीमुळे तोट्यातील एसटी नफ्यात आली**

महिलांना तिकिटात ५० टक्के सवलतीची योजना आणली. एसटी महामंडळाचे लोक आले. त्यांनी एसटी दिवाळखोरीत निघेल, अशी भीती व्यक्त केली. त्यांना काळजी न करण्याचा सल्ला दिला. महिनाभरापूर्वी तेच लोक परत आले. काहीही झाले तरी योजना बंद करू नका अशी गळ घालू लागले. योजना सुरू झाल्यापासून महिला प्रवासी वाढले. तोट्यातील एसटी नफ्यात आल्याचे त्यांनी सांगितले. घरच्या मंडळींना थांबवून निम्म्या तिकिटात लाडक्या बहिणी काम करून येऊ लागल्या आहेत. हा सक्षम बदल असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले आहे.

**महाविकास आघाडीवाल्यांच्या डोक्याचे नटच कसतो!**

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना ओवाळणी म्हणून दर महिन्याला १५०० रुपये देतो. आम्ही पैसे देऊ असे सांगताच महाविकास आघाडीच्या नेत्यांनी वेड्यात काढले. अनेक वल्गना केल्या. हायकोर्टात गेले. कोर्टाने योजना बंद करण्यास नकार दिला. यानंतर आम्ही त्यांच्या नाकावर टिच्चून नोव्हेंबर महिन्यापर्यंतचे पैसे खात्यावर दिले. तुमचा आशीर्वाद मिळाला की २१००रुपये आम्ही लाडक्या बहिणींना देणार आहोत. महाविकास आघाडीवाल्यांचे हे षडयंत्र थांबविण्यासाठी त्यांच्या डोक्याचे नटच कसतो. मग लाडक्या बहिणींविषयी असले विरोधी विचार त्यांच्या डोक्यात येणार नाही, अशी खोचक टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

**शेतकरी म्हणाले, आता पडक्या दराची चिंता मिटली!**

बाजारात भाव कोसळले की कुठलेही संरक्षण मिळत नसल्याने अडचण होत होती. अनेकदा घरात शेतमाल पाडून ठेवावे लागत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हमीभावातील फरकाची रक्कम थेट खात्यावर जमा करण्याची घोषणा केल्याने आमची मोठी अडचण दूर झाली आहे. आता गरज असल्यास कमी भाव असतानाही मालाची विक्री करणे शक्य होईल. हा मोठा दिलासा आहे, अशा शब्दांत अमरावती जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने या घोषणेनंतर आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

# सैनिक मतदारांचे 'इटीपीबीएस' प्रणालीने होणार मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील ३ हजार२७९ सैनिकांचे देशात इतरत्र कार्यरत असलेल्या ठिकाणावरून इटीपीबीएस अर्थात इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट सिस्टमद्वारे मतदान केले जाणार आहे. निवडणूक आयोगाने त्यांच्याकरिता हो सुविधा उपलब्ध केली आहे.जिल्ह्यात दर्यापूर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ९२३ सैनिक मतदार आहे. लोकसभा निवडणुकीत ३२२८ सैनिक मतदार असताना विधानसभेमध्ये ३२७९ मतदारांची नोंद झाली आहे. यामध्ये सहा महिन्यांत ५१ मतदार वाढले आहेत.

लोकशाहीने सर्वांनाच मतदानाचा अधिकार दिल्याने जे सैनिक जिल्ह्याबाहेर कार्यरत आहेत, त्यांच्याकरिता देखील मतदानाची सुविधा उपलब्ध करून३२७९ सैनिक मतदार, लोकसभेच्या तुलनेत ५१ मतदार वाढले दर्यापुरात सर्वाधिक ९२३ सैनिक मतदार देण्यात आली आहे. बहुतांश सैनिक हे राज्याबाहेर कार्यरत असल्याने त्यांच्याकडून मतमोजणीच्या दिवसांपर्यंत मतदान केल्याचे बॅलेट स्वीकारले जाते. परंतु, यापूर्वी वेळेपर्यंत देखील त्यांचे बॅलेट पेपर अप्राप्त होत असल्याने ते मतमोजणीत येत नव्हते. त्यामुळे त्यांच्या मतदानाकरिता आता आयोगाकडून इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बैलेट सिस्टमद्वारे सुरू केली आहे.



यामध्ये जे मतदार ज्या ठिकाणी कार्यरत आहे, त्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून बॅलेट मतदान पत्रिका मतदारांपर्यंत पोहोचवली जाते. त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून सैनिकांना ते बॅलेट दिले जाते. सदर मतदार हे त्या बॅलेट पेपरवर मतदान करून ते स्पीड पोस्टाद्वारे पाठवितो. सोबतच त्यावर स्कॅनरदेखील असते. त्यामुळे निवडणूक विभागाला हे पोस्टल प्राप्त झाल्यानंतर स्कॅनद्वारे ते कुणाचे मत आहे, हे पाहले जाते. त्यानंतर त्यांचे मतदान ग्राह्य धरले जाते. ते मतमोजणीच्या दिवसापर्यंत स्ट्रॉगरूममध्ये ठेवले जाते. मतमोजणीच्या दिवशी या मतदाराचे मत मोजणी केली जाते, इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेटमुळे सदरचे पोस्टल बॅलेट त्या सैनिकांना तातडीने प्राप्त होते. त्यामुळे मतमोजणीच्या दिवसापर्यंत ते निवडणूक विभागात पोहोचण्यास मदत होते. विधानसभेत ३२७९ सैनिक मतदारांची नोंद करण्यात आली आहे. यावेळी ५१ मतदार या यादीत वाढले आहेत. निवडणूक विभागाकडून या सैनिकांना पोस्टल बॅलेट पाठविण्यात आले आहे.




# प्रचार सभांनी गाजणार पुढील आठवडा

## प्रचाराचा अंतिम टप्पा : प्रमुख पक्षांनी केले नियोजन
## महाविकास आघाडीकडून राहुल गांधी यांच्या सभेसाठी आग्रह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

उमेदवारी अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया पूर्ण, चिन्ह वाटप झाल्यानंतर ५ नोव्हेंबरपासून विधानसभा निवडणुकीसाठी रिंगणात असलेल्या उमेदवारांनी प्रचाराला जोरदार सुरुवात केली. जाहीर प्रचारासाठी उमेदवारांना १३ दिवसांचा कालावधी मिळणार आहे. त्यातच पुढील आठवडा प्रचाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे या आठवड्यात दिग्गज नेत्यांच्या सभांचे नियोजन करण्यात आले असून यातून वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न सर्वच प्रमुख पक्षांचा आहे.




जिल्ह्यात आतापर्यंत महाविकास आघाडीकडून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे,काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे तर महायुती कडून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मनसे अध्यक्ष राज ठाकरेयांच्या जाहीर सभा झाल्यात.

प्रचारसभा या तोडीस तोड व्हाव्यात यासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांची बारीक नजर आहे. त्यानुसार वरिष्ठ नेत्यांच्या सभांचे नियोजन केले जात आहे. २० नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार असल्याने १८ नोव्हेंबरला प्रचारतोफा थंडावणार आहे. त्यामुळे पुढील आठवडा हा प्रचाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.या प्रमुख नेत्यांच्या सभांच्या माध्यमातून अंतिम टप्प्यात वातावरण निर्माण करून मते कॅश करण्याचा सर्वच प्रमुख पक्षाच्या उमेदवारांचा प्रयत्न असणार आहे. त्यादृष्टीने सध्या सभांचे नियोजन केले जात आहे.

# निवडणूक विधानसभेची, परीक्षा लीड देणाऱ्या भावी नगरसेवकांची

## एका वॉर्डात १० ते १२ इच्छुक, सर्वच लागले कामाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १० अमरावती**

मागील लोकसभा निवडणुकीत सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आमदारांची परीक्षा घेतली. कोण कोणत्या विधानसभा मतदारसंघातून लीड मिळवून देतो असा निकष ठेवण्यात आला होता. आता विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्षांनी इच्छुक नगरसेवकांची परीक्षा घेण्याचे निश्चित केले आहे. कोणत्या वॉर्डातून किती लीड मिळेल यावर नगरसेवकाची उमेदवारी मिळेल. त्यामुळे इच्छुकांनी चांगलीच कंबर कसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



### प्रचारासाठी नऊ दिवस शिल्लक

शहरी भागात विधानसभामतदारसंघाची भौगोलिक रचना ग्रामीणपेक्षा छोटी आहे. लोकसंख्याजास्त आहे. त्यामुळे उमेदवारांना मतदारसंघात प्रचार करणे एवढे अवघड जात नाही. बहुतांश उमेदवारांनी वॉंडातील आपल्या माजी नगरसेठकांसह, इच्छुकांकडे विविध जबाबदाऱ्या सोपविल्या. कारण प्रचारासाठी आठा नऊ दिवसच शिल्लक आहेत.

एप्रिल २०२० पासून महानगरपालिकेत नगरसेवक नाहीत. पाच वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. मागील पाच वर्षांत अनेकदा पालिकेच्या निवडणुकाहोतील असे सांगण्यात आले. मात्र, निवडणूक काही झाली नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीचा नादच सोडून दिला. वॉर्ड सांभाळणे म्हणाजे इच्छुक उमेदवार, माजी नगरसेवकाला मोठी कसरत करावीलागते. छोटे-मोठे प्रश्न, नागरिकांच्या अनेक समस्यांचे समाधान करावे लागते, विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपा, उद्धवसेना, शिंदेसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी (श.प), राष्ट्रवादी अजित पवार गट, एमआयएम आदी पक्षांनी नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना चांगलेच कामाला लावले आहे. एका वॉर्डामध्ये चार ते पाच इच्छुक एकाच पक्षाकडून आहेत. उमेदवारांनी सर्वच इच्छुकांना जबाबदारी सोपविली आहे.

# स्वीप-मतदार जनजागृती कार्यक्रम पथक

## धारणी तालुक्यातील गावात मतदार जनजागृती सुरु




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०धारणी**


आज रत्नापूर या गावाला भेट देऊन मतदार जनजागृती करण्यात आली. रत्नापूर येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा भव्य कबड्डीचे सामने आयोजित करण्यात आले होते. येथे डतएएझ पथक प्रमुख तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, धारणी श्री. सुनील खडे यांनी उपस्थित सर्व खेळाडू , प्रेक्षक आणि गावातील नागरिक यांना मतदान करण्यासंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन करून मतदान करण्याचे आवाहन केले. यानंतर सर्व उपस्थित यांना मतदारांना प्रतिज्ञा/ शपथ देण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये जवळपास १८०० ते २००० लोक उपस्थित होते.या पथकामध्ये डतएएझ नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी श्री. सुनील खडे व डतएएझपथक सदस्य श्री. बाबूलाल जावरकर विअ शिक्षण , श्रीमती उमेकर मॅडम विअ शिक्षण, श्री. योगेश मालवीय (वरिष्ठ सहायक ), श्री. संजय इंगळे एबीपी फेलो पंचायत समिती धारणी हे मेळघाट विधानसभा मतदारसंघात मतदार जनजागृती करून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.असे स्वीप कक्षाचे राजेश सावरकर यांनी कळविले.

# साहेब, निवडणूक येते अन् जाते; आम्हास सर्व दिवस सारखेच
## बेरोजगार, कष्टकऱ्यांची व्यथा महागाईने बिघडविले आर्थिक गणित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

जिल्ह्यातील आठ ही विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये प्रत्येक मतदाराला निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावण्याचा अधिकार आहे.

लोकशाहीकरिता हा हक्क बजावताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुटी देण्यात आली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना या दिवसाचा पूर्ण पगार मिळणार आहे; मात्र शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, अकुशल कामगारांनी मतदानासाठी सुटी घेतल्यास त्यांच्या दिवसभराची मजुरी



बुडणार आहे. त्यामुळे निवडणुकीत कोण जिंकले, कोण हरले? आमच्यासाठी सर्व दिवस सारखेच असल्याचे मत शेतकरी, शेतमजूर व्यक्त करीत आहेत.

लोकशाहीत मतदानाला महत्त्वाचे स्थान आहे. १८ वर्षांवरील सर्व मतदारांनी मतदान करणे आवश्यक असून, मतदानाच्या दिवशी सरकारी कर्मचाऱ्यांना पगारी सुटी देण्यात येते. तसेच उद्योग विभागांतर्गत येणाऱ्याप्रत्येक उपक्रम व आस्थापनेला पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नसल्यास मतदानासाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने दोन तासांची सवलत मिळणार आहे. कर्मचाऱ्यांचा पगार न कापता मतदानाचा हक्क बजावता येणार आहे; मात्र जगाचा पोशिंदा असलेले शेतकरी, शेतमजूर व रोजंदारीवर काम करणारे तसेच अकुशल कामगार मानधनावर काम करणारे कामगार, हातावर पोट असलेल्या कष्टकऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे कामावर न जाता मतदानासाठी एक दिवसाची पूर्ण रोजंदारीची मजुरी मिळेल काय? एक दिवस कामावर न गेल्यास संध्याकाळची चूल पेटणार का ? अशी गरिबांची अवस्था आहे.

> सध्या ३०० ते ४०० रुपये मजुरी मिळते. निवडणूक होण्यापूर्वीही आता मिळते तेवढीच मजुरी होती. पुढेही एवढीच मजुरी राहणार आहे. त्यामुळे कोण निवडून आले आणि कोण पडले? यामुळे काहीही फरक पडत नाही. आमच्यासाठी सर्व दिवस सारखेच. कष्टकरी व गरजूंना त्यांच्या समस्यांवर विचार करणारे सरकार हवे आहे. ते आता तरी मिळणार का ? पाच वर्षे झाली की, निवडणुका होतात. आम्ही मोठ्या उत्साहाने मतदानाचा हक्क बजावतो. त्यामुळे निवडणुकीबद्दल आता काहीच वाटत नाही.
>
> **जया शेळके चांदुर बाजार**

> निवडून आल्यानंतर सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा विचार होणे अपेक्षित आहे. त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडविणे गरजेचे आहे; परंतु सरकार निवडून देणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार होत नाही. त्यांच्या समस्यांची गांभीयनि दखल घेऊन त्या सोडविल्या जात नाहीत.
>
> **राजेश कूटे अचलपूर**

# फडणवीसांचा महविकास आघाडीवर घणाघात





**राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज अमरावती जिल्ह्यात दिन विशाल सभा पार पडल्या पहिली सभा मेळघाट मधील महायुतीचे उमेदवार केवलराम काळे यांच्या प्रचारार्थ घेण्यात आली तर दुसरी सभा धामणगाव रेल्वे मतदार संघाचे लोकप्रिय उमेदवार प्रतापदादा अडसड यांच्या प्रचारार्थ घेण्यात आली. या दोन्ही सभेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला विशेष या दोन्ही सभेत लाडक्या बहिणींची मोठ्या प्रमाणात गर्दी होती या वेळी केवलराम काळे व प्रतापदादा अडसड यांच्या विजयाचा संकल्प या सभेत घेण्यात आला. यावेळी देवेंद्र फडणवीसांनी महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला.**

# लाडक्या बहिणींनी केला बच्चू कडू यांच्या विजयाचा संकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १० चांदुरबाजार**

लोकसभा पराभवानंतर महायुतीने लाडकी बहीण योजना अंमलात आणली. महिलांनी महायुतीला भरभरून मते द्यावी एवढाच यामागील उद्देश होता मात्र अचलपूर मतदार संघातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या या उद्देशाला हरताळ फासत परिवर्तन महशक्तीचे उमेदवार लोकनेता बच्चू कडू यांच्या विजयाचा संकल्प केला.तालुक्यातील कुरळपूर्णा येथे महिलाशक्तीच्या झालेल्या भव्य मेळाव्यात महिलावर्गांनी बच्चू कडू यांच्या कार्याप्रती आदर दाखवत त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या. बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडलेल्या या महिला मेळाव्याला माजी जि.प. सदस्य कविता दामोदर, पं.स. सदस्य सुनीता झिंगरे, वंदना भोकसे, फुबगाव येथील सरपंच सविता किटूकले उपसरपंच सुषमा पळसपगार,झिंगरे ताई, स्टेला मॅडम,पद्मा मेसकर, अनिता दाकडे, शारदा सहारे आदी मान्यवर महिला शक्ती उपस्थित होती.याप्रसंगी उपस्थित महिलांनी बच्चू कडू यांचे औक्षण करत त्यांच्यावर पुष्पवर्षाव केला.यावेळी महिलांनी बच्चू भाऊ तुम आगे बढो च्या घोषणा दिल्या.



स्टेलामॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की, बच्चू कडू यांनी मागील वीस वर्षांत केवळ जनतेच्या भावनांचा आदर केला, त्यांनी जाती धर्मापलीकडे जाऊन केवळ मानवतेच्या नात्याने रुग्णसेवा केली.आजकाल सर्वत्र जाती धर्माचे वेड लागले असतांना केवळ बच्चू कडू यांनी या गोष्टीला छेद देत सामाजिक कार्याला वाहून घेतले आहे. आज अचलपूर मतदारसंघच नव्हे तर अख्या महाराष्ट्राला बच्चू कडू यांच्या कार्याची जाणीव आहे त्यामुळे यावेळी सुद्धा महिलाशक्ती ही बच्चू कडू यांच्या बाजूने भक्कमपणे उभी असल्याची भावना महिलांच्या वतीने त्यांनी मांडली. परिसरातील हजारो महिलांनी या मेळाव्याला उपस्थिती दर्शविली होती.उपस्थित महिलांनी बच्चू कडू यांच्या विजयाचा संकल्प करत त्यांना भरगोस मतांनी विजयी करण्याचा विश्वास व्यक्त केला.

# विधानसभा निवडणुकीत हरवले जनतेचे प्रश्न
## नेत्यांसह कार्यकर्ते आपापल्या प्रचारात व्यस्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाल्यापासून अधिकारी व सरकारी कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. आजी- माजी आमदार, माजी जिल्हा परिषद व पंचायत समितीसह ग्रामपंचायत सरपंच, सदस्य आपापल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारात गुंतले आहेत. या परिस्थितीत जनतेच्या समस्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष होत असून, लोकांची कामेही रखडत असल्याची चर्चा होत आहे.

अमरावती विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी निवडणूक होणार आहे. निवडणुकीच्या रिंगणात महायुती, महाविकास आघाडीतील उमेदवार व इतर उमेदवार मैदानात आहे. मात्र, मतदारसंघात भेडसावत असलेले शेतकऱ्यांसह बेरोजगारी आदी अनेक प्रश्न या निवडणुकीत हरवले आहेत का, असा प्रश्न सर्वसामान्य लोकांना पडला आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समितीवर प्रशासकीय राजवट असल्याने अधिकारी निवडणुकीच्या कामातव्यस्त असल्याने तालुक्यासह गावांत अनेक प्रलंबित असलेली कामे अजूनही जशीच्या तशीच आहे. शहरात ठिकठिकाणी अर्धवट पडलेली कामे तसेच सोयाबीन, कापसाचे पडलेले भाव व रासायनिक खताचे वाढलेले भाव तसेच जीवनावश्यक वस्तूच्या व वाढलेल्या किमती या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून प्रचाराला अधिक महत्त्व दिले जात आहे. देशात युवकांसमोर बेरोजगारीचा प्रश्न महत्त्वाचा बनला आहे. त्यावर कुणीच बोलायला तयार नाही.

शेतकऱ्यांवर संकटावर संकटे येत आहे. त्यांच्या मदतीला सध्या कुणीच धावून येताना दिसत नाही. त्यामुळे प्रचारातून जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न गायब होताना दिसत आहेत. ऐन दुष्काळात जनता हवालदिल झाली आहे. मात्र, सध्या जनतेच्या प्रश्नांवर कोणीच बोलायला तयार नाही. भावनिक मुद्द्याचे राजकारण करीत टीकाटिप्पणी केली जात आहे. या चिखलफेकीमुळे कार्यकर्त्यांची तेवढी करमणूक होत आहे. माध्यमातून आगपाखड होत आहे. मात्र, जनतेच्या प्रश्नांवर चर्चा होताना दिसत नाही.

**कामेही रखडली...**

२० नोव्हेंबरला निवडणूक आहे. २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागणार असल्याने आचारसंहितेच्या काळात नवीन कामांना मंजुरी मिळणार नाही. मात्र, मंजूर झालेली कामे करता येतात. मात्र, अनेक ठिकाणी कामे बंद असल्याने रोष व्यक्त केला जात आहे.

